

पनवेल : पनवेल अर्बन बँकेच्या निवडणुकीकरिता भाजपप्रणित उत्कर्ष पॅनलच्या उमेदवारांनी महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली बुधवारी प्रचार केला. भारत नाका, विरुपाक्ष मंदिर, गावदेवी मंदिर, भगत आळी, लाइन आळी, छत्रपती शिवाजी महाराज पुतळा, वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह, कर्मवीर भाऊराव पाटील चौक, कापड गल्ली, मिरची गल्ली भाग-१, मोहल्ला, रोहिदास वाडा, एम. जी. रोड विभागातील प्रत्यक्ष मतदारांना भेटून विजयी करण्याचे आवाहन केले. (सविस्तर वृत्त उद्याच्या अंकात)


गुरुवार, २४ नोव्हेंबर २०२२

◆ वर्ष १५ ◆ अंक १२७

www.ramprahar.com

# राम प्रहर

◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २ ◆ रायगड


## सीमाप्रश्नी तोडगा काढण्यासाठी ठोस पावले उचलणार

# महाराष्ट्रातील एकही गाव जाणार नाही

## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा निर्धार

**नागपूर : प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील जत तालुक्यातील ४० गावांना कर्नाटकमध्ये यायचे आहे. या गावांनी तसा ठराव केलेला असून आम्ही त्यावर गांभिर्याने विचार करीत आहोत, असे कर्नाटकचे मुख्यमंत्री बसवराज बोम्मई म्हणाले आहेत. बोम्मई यांच्या याच विधानानंतर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याबाबत सांगितले की, २०१२ साली ठराव केला होता. आता कोणत्याही गावाने कोणताही ठराव केला नाही. महाराष्ट्रातील एकही गाव कुठे जाणार नाही. ते नागपुरात माध्यम प्रतिनिधींशी बोलत होते.

राज्य सरकारने नुकतेच महाराष्ट्र-कर्नाटक सीमा प्रश्नावर तोडगा काढण्यासाठीच्या उच्चाधिकार समितीचे पुनर्गठन केले आहे. या समितीत काँग्रेसचे पृथ्वीराज चव्हाण, राष्ट्रवादीकडून खासदार शरद पवार, अजित पवार यांच्यासह शिवसेना ठाकरे गटाकडून अंबादास दानवे आणि भाजप-युती सरकारमधील काही मंत्र्यांचा समावेश आहे, तसेच सीमाप्रश्नाबाबत चंद्रकांत पाटील आणि शंभूराज देसाई यांची समन्वयकपदी नियुक्ती करण्यात आली आहे. त्यामुळे सीमाप्रश्नावर तोडगा काढण्यासाठी राज्य शासनाने पावले उचलण्यास सुरुवात केली आहे.

फडणवीस पुढे म्हणाले, सीमावादाच्या प्रश्नावर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बैठक घेतली. या बैठकीत महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. सीमाभागातील लोकांची पूर्ण मदत करण्याचे आपण ठरवलेले आहे. त्यासाठी काही योजनांची सुरुवात करण्यात येणार आहे. याअगोदरही काही योजना सुरू होत्या. त्यामुळे कर्नाटकच्या मुख्यमंत्र्यांनी तसे विधान केले असावे. महाराष्ट्रातील एकही गाव कोठेही जाणार नाही. आम्ही सर्वोच्च न्यायालयात लढून बेळगाव, कारवार, निपाणी यांच्यासह सर्व गावं मिळवण्याचा प्रयत्न करणार आहोत, असे फडणवीस यांनी सांगितले.



**याबाबत नुकतीच आम्ही बैठक घेतली आहे. कर्नाटकातील आपल्या लोकांना मदत करण्याचा आम्ही निर्णय घेतला असून काही योजना सुरू करण्यात येणार आहेत. त्यामुळे या लोकांना मदतच होणार आहे. एकही गाव कुठेही जाणार नाही. उलट इतर गावेही आपण मिळवणार आहोत.**
**-एकनाथ शिंदे, मुख्यमंत्री, महाराष्ट्र**

जतमधील काही गावांनी २०१२ साली कर्नाटकमध्ये जाण्याचा ठराव केला होता. आता नव्याने कोणत्याही गावाने कसलाही ठराव केलेला नाही. २०१२ साली आम्हाला पाणी मिळत नाही, म्हणत त्यांनी हा ठराव केला होता. मी जेव्हा मुख्यमंत्री होतो तेव्हा कर्नाटकशी चर्चा केली होती. म्हैसाळच्या सुधारित योजनेत या गावांचा समावेश करण्याचा निर्णय घेण्यात आली होता. त्यासाठीची योजनाही तयार झाली होती. मागील अडीच वर्षांच्या काळात या योजनेला मान्यता देण्यात आली नाही. कोरोनामुळे यावर निर्णय घेता आला नसावा, मात्र आता आम्ही या योजनेला तत्काळ मान्यता देणार आहोत. या गावांना लवकरच पाणी मिळणार आहे. या योजनेला केंद्र सरकारने पैसा दिलेला आहे. या योजनेसाठी पैशांची अडचण नाही, असेही फडणवीस यांनी स्पष्ट केले.

महाराष्ट्रातील एकही गाव कुठे जाणार नाही. आम्ही सर्वोच्च न्यायालयात लढून बेळगाव, कारवार, निपाणीसह जी गावे आमची आहेत, ती सर्व गावे मिळवण्याचा आम्ही प्रयत्न करू, असे देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले आहे. दोन्ही राज्यांच्या राज्यपालांची नुकतीच बैठक झाली. त्याआधी दोन्ही राज्यातील जलसंधारण मंत्र्यांचीही बैठक झाली होती. अशा बैठका झाल्याच पाहिजे कारण आपण एकाच देशात राहतो. आपल्यात काही शत्रुत्व नाहीये. हा एक कायदेशीर वाद आहे. त्यामुळे चर्चा झाली पाहिजे, असे फडणवीस म्हणाले आहेत.

# स्थानिकांच्या रोजगार, हिताला प्राधान्य द्या -मुख्यमंत्री

## रायगडातील आरसीएफ, जेएसडब्लूप्रश्नी बैठकीत निर्देश

**मुंबई : प्रतिनिधी**

आपल्या राज्याचे धोरण उद्योगस्नेहीच आहे. त्यासाठी उद्योगांना गुंतवणूक वाढ, प्रकल्प विस्तारासाठी सहकार्यच केले जाईल, पण उद्योगांनीही स्थानिकांच्या रोजगार आणि हिताला प्राधान्य द्यावे, असे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले.

रायगडातील अलिबाग तालुक्यातील राष्ट्रीय केमिकल्स ॲण्ड फर्टिलाइजर्स (आरसीएफ) कंपनीच्या थळ येथील विस्तारीत प्रकल्पाबाबत आणि डोलवी-पेण येथील जेएसडब्ल्यू कंपनीतील स्थानिकांच्या प्रश्नांबाबत मुख्यमंत्री शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवारी बैठक झाली. या बैठकीस उद्योगमंत्री उदय सामंत, खासदार राहूल शेवाळे, आमदार महेंद्र दळवी, उद्योग विभागाचे प्रधान सचिव हर्षदीप कांबळे, पर्यावरण विभागाचे सचिव प्रवीण दराडे, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. विपीन शर्मा, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डचे मुख्य कार्यकारी अधिकारी अमित सैनी, रायगडचे जिल्हाधिकारी महेंद्र कल्याणकर, पोलीस अधीक्षक सोमनाथ घारगे, आरसीएफचे अध्यक्ष श्रीनिवास



मुडगेरीकर, वाडवली, न्यू कफ परेड परिसरातील रहिवाशांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

मुख्यमंत्री शिंदे म्हणाले, राज्य सरकार उद्योगांच्या विकासाला पूर्ण सहकार्यच करेल. कंपन्याचा विस्तार व्हावा, गुंतवणूक वाढ व्हावी, तसेच रोजगाराच्या संधी वाढाव्यात असेच प्रयत्न आहेत, पण उद्योगांनीही प्रकल्पबाधितांना नोकऱ्या देण्याबाबत सकारात्मक दृष्टीकोन ठेवा. जास्तीत जास्त प्रकल्पबांधितांना नोकऱ्यांमध्ये स्थान मिळावे, असे प्रयत्न करावेत.

थळ येथील विस्तारात स्थानिक १४१ प्रकल्पबाधितांच्या हिताचे रक्षण व्हावे यासाठी आरसीएफ आणि राज्य शासनाच्या वतीने प्रयत्न करण्यात येत आहेत. आरसीएफ त्यांच्या केंद्रीय यंत्रणांकडून याबाबत मार्गदर्शन घेणार आहे. **(पान २ वर...)**



**पनवेल : जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनी येथील चांगू काना ठाकूर आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज (स्वायत्त) येथे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण अंमलबजावणीची आव्हाने तथा संधी यावर बुधवारी एक दिवसीय कार्यशाळा झाली. या कार्यशाळेचे उद्घाटन संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर व आयआयटी येथील भौतिकशास्त्र विभागाचे वरिष्ठ प्राध्यापक बी. एन. जगताप यांच्यासह इतर मान्यवरांच्या हस्ते झाले.** (वृत्त पान २ वर...)

## निवडक

### पालघरसह अरुणाचल प्रदेशमध्ये भूकंपाचे धक्के

**पालघर** : पालघर जिल्ह्यासह अरुणाचल प्रदेश येथे बुधवारी (दि. २३) भूकंप धक्क्यांची नोंद झाली आहे. पालघरमधील भूकंपाची तीव्रता ३.६ रिश्टर स्केल आहे. अरुणाचल प्रदेशमधील बासर भागापासून ५८ किमीवर ३.८ रिश्टर स्केल तीव्रतेचे धक्के बसले. पालघर जिल्ह्यातील डहाणू व तलासरी तालुक्यात पहाटे चार वाजून चार मिनिटांनी भूकंपाचा धक्का बसला.

### नागपूरच्या कळमना कृषी उत्पन्न बाजार समितीत आग

**नागपूर** : कळमना कृषी उत्पन्न बाजार समितीत बुधवारी (दि. २३) पहाटे २ वाजण्याच्या सुमारास भीषण आग लागली. या आगीत बाजार समितीत ठेवण्यात आलेली कोट्यवधींची मिरची जळून खाक झाली. काही तासांच्या प्रयत्नानंतर आगीवर नियंत्रण मिळवण्यात यश आले. आगीचे नेमके कारण अद्याप स्पष्ट होऊ शकले नाही. या यार्डमध्ये चार हजारांच्या जवळपास भरलेले पोते होते. जवळपास पाच कोटींचे नुकसान झाल्याचे समजते.

# श्रद्धाने लिहिलेले पत्र गंभीर

## चौकशीचे आदेश



**नवी दिल्ली, मुंबई : प्रतिनिधी**

लिव्ह-इन-पार्टनर श्रद्धा वालकरची हत्या करून मृतदेहाचे तुकडे केल्याप्रकरणी आफताब अमीन पूनावाला याला दिल्ली कोर्टाने मंगळवारी चार दिवसांची पोलीस कोठडी वाढवून दिली. २३ नोव्हेंबर २०२० रोजी श्रद्धाने आफताबविरोधात तक्रार दाखल केली होती. आफताब हा गळा दाबून मारहाण करत असल्याची तक्रार श्रद्धाने नालासोपारा पूर्वमधील तुळींज पोलीस ठाण्यात दाखल केली होती, मात्र १९ डिसेंबर २०२० रोजी श्रद्धाने ही तक्रार मागे घेतली असल्याचे समोर आले आहे.

यावर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पत्र लिहूनही पोलिसांनी कारवाई का केली नाही, याची चौकशी करणार असल्याचे सांगितले आहे.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीदेखील श्रद्धाने लिहिलेले पत्र गंभीर असल्याचे म्हटले आहे. मी श्रद्धाने लिहिलेले पत्र वाचले. पत्र लिहूनही पोलिसांनी कारवाई का केली नाही, याची चौकशी करणार आहे. मी कोणावरही आरोप करीत नाही, मात्र वेळीच कारवाई झाली असती तर तीचा जीव वाचला असता, असे देवेंद्र फडणवीसांनी सांगितले.

दरम्यान, आफताबपासून जीवाला धोका असल्याची तक्रार २०२०मध्येच श्रद्धाने याबाबत नालासोपाऱ्यातील तुळींज पोलीस स्थानकात दाखल केली होती. आफताब सतत गळा दाबून मारण्याची धमकी देत असल्याचे श्रद्धाने तक्रारीत नमूद केले होते, तसेच आफताबच्या परिवाराला याबाबत सर्व कल्पना असल्याचेही श्रद्धाने तक्रारीत म्हटले होते.

## 'कॅग'चे पथक मुंबई महापालिकेत

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबई महापालिकेतील १२ हजार कोटींच्या व्यवहाराची चौकशी कंट्रोल ऑफ ऑडिटर जनरल ऑफ इंडिया (कॅग)कडून सुरू करण्यात आली आहे. कॅगचे आठ ते १० अधिकारी बुधवारी (दि. २३) महापालिकेच्या मुख्यालयात दाखल झाले.

कोरोना काळात झालेल्या कामांच्या वाटपाची कॅगच्या माध्यमातून चौकशी करण्याचे आदेश राज्य सरकारने दिले होते. महापालिकेच्या सुमारे १० खात्यातून झालेले व्यवहार कॅगच्या रडारवर असणार आहे. कॅगच्या अधिकाऱ्यांनी महापालिका आयुक्त इक्बाल सिंह चहल यांच्यासोबत बैठक घेतली. बैठकीनंतर पथकाने अकाउंट्स विभागात जाऊन व्यवहाराची माहिती घेतली. त्या व्यवहारांचे काही कागदपत्रेही ताब्यात घेतल्याची माहिती आहे.

# जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेत लोकनेते रामशेठ ठाकूर स्कूलचे यश

## आमदार प्रशांत ठाकूर यांच्याकडून विद्यार्थ्यांचे कौतुक



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या कामोठे येथील लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्लिश मिडियम स्कूल व ज्युनिअर कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी जिमखाना येथे झालेल्या आंतरविद्यालयीन बॉक्सिंग स्पर्धेत दणदणीत विजय प्राप्त केला. विद्यालयाचे चेअरमन आमदार प्रशांत ठाकूर यांनी सर्व विद्यार्थ्यांचे विशेष कौतुक करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

जिल्हास्तरावर झालेल्या या बॉक्सिंग स्पर्धेत विद्यालयाच्या १६ विद्यार्थ्यांनी यश संपादन केले. १४ वर्षे वयोगटात मुलांमध्ये श्रवण शेजल व श्रवण चाचर या दोघांनी द्वितीय तर तन्मय दळवी याने ४४ ते ४६ किलो वजन गटात प्रथम क्रमांक मिळवला. १७ वर्षांखालील मुलांच्या वयोगटात अथर्व म्हात्रे (८० किलो) वजन गटात याने प्रथम क्रमांक प्राप्त केला, तसेच स्मित भोईर (५२ ते ५४ किलो) याने प्रथम तर आदित्य कोडलकर व प्रज्वल भोर (७० ते ७५ किलो) याने द्वितीय क्रमांक पटकावला. **(पान २ वर...)**

# रायगडातील जत्रांमध्ये लाखोंची उलाढाल



**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात सध्या जत्रांचा हंगाम सुरू आहे. कोरोनाच्या निर्बंधांमुळे दोन वर्ष कुठेही जत्रा झाल्या नव्हत्या. आता निर्बंध उठवण्यात आले आहेत. दोन वर्षानंतर जत्रा भरत असल्यामुळे या जत्रांना प्रचंड प्रतिसाद मिळत आहे. जत्रांमध्ये परप्रांतीय विक्रेते जास्त आहेत. दिवसाला लाखो रुपयांची उलाढाल होत आहे.

आवास, कनकेश्वर, साजगावच्या बोंबल्या विठोबा यांच्या यात्रा झाल्या. सध्या अलिबाग तालुक्यातील वरसोली येथील विठ्ठलची यात्रा सुरू आहे. पाच दिवस चालणाऱ्या या यात्रेला भाविकांचा भरभरून प्रतिसाद मिळत आहे. दररोज सुमारे २० ते २५ हजार भाविक यात्रेला भेट देत आहेत. यात्रेच्या निमित्ताने कपडे, चादरी, पडदे, शोभेच्या वस्तू, आकर्षक फुले, भांडी, खेळणी, गृहोपयोगी वस्तू, खाद्यपदार्थांचे स्टॉल्स यांची रेलचेल आहे. त्यामुळे ग्राहकांनी खरेदीवर जोर दिला आहे. यात्रेत कपडे, भांडी आणि खेळणी यांच्या खरेदीकडे ग्राहकांचा कल आहे.

अडीशे ते तीनशे रुपयाला मिळणाऱ्या चादरी चारशे रुपयाला मिळत आहेत. दोनशे रुपयांचे पडदे अडीचशे रुपयांना विकले जात आहेत. आकाश पाळण्याचा दर प्रति व्यक्ती १०० रुपये आहे. पूर्वी ७० ते ८० रुपयांना मिळणारी खेळणी १०० ते १२० रुपयांना विकली जात आहे.



(छाया : विकास म्हात्रे)

# खेरणे गावात रस्त्याचे काँक्रीटीकरण

## *भाजप नेते अरुणशेठ भगत यांच्या हस्ते उद्घाटन*

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पक्षाचे पनवेल तालुका अध्यक्ष आणि जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत यांचा वाढदिवस मंगळवारी (दि. २२) विविध सामाजिक उपक्रमांनी साजरा करण्यात आला. त्यानिमित्त भारतीय जनता पक्षाचे रायगड जिल्हा अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या निधीतून खेरणे गावात रस्त्याचे काँक्रीटीकरण करण्यात आले. या कामाचे उद्घाटन पनवेल तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते करण्यात आले.

खेरणे गावात रस्त्याचे काँक्रीटीकरणाच्या उद्घाटनावेळी जिल्हा उपाध्यक्ष प्रल्हाद केणी, माजी उपमहापौर जगदीश गायकवाड, भाजप ओबीसी मोर्चा उत्तर रायगड सरचिटणीस दशरथ म्हात्रे, पनवेल पंचायत समितीचे माजी सदस्य भूपेंद्र पाटील, खेरणेचे सरपंच शैलेश माळी, उपसरपंच राजेंद्र गोंधळी, ग्रामपंचायत सदस्य अशोक गोंधळी, चंद्रकांत गोंधळी, प्रदीप माळी, धोंडीराम पाटील, अनिल गोंधळी, प्रदीप गोंधळी, चाहु माळी, माजी सरपंच बुधाजी माळी, पांडुरंग माळी, भास्कर माली, राजेश माली, निलेश गोंधळी आदी उपस्थित होते.

## कारागृहांची संख्या वाढणार

**मुंबई : प्रतिनिधी**

भविष्यातील गरजा लक्षात घेऊन १५ हजार कैद्यांना सामावून घेण्याची क्षमता असलेली आणखी १४ कारागृहे उभाण्याची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती राज्य सरकारतर्फे नुकतीच उच्च न्यायालयात देण्यात आली. राज्याचे मुख्य सचिव मनु कुमार श्रीवास्तव यांनी याबाबतचे प्रतिज्ञापत्र दाखल करून ही माहिती दिली.

सद्यस्थितीला राज्यात ३६ कारागृहे असून २३,२१७ कैद्यांना ठेवण्याची त्यांची क्षमता आहे. मात्र या कारागृहांमध्ये ४२ हजारांहून अधिक कैदी बंदिस्त आहेत. भविष्यातील गरज लक्षात घेऊन अहमदनगर, बारामती, पालघर, हिंगोली, गोंदिया, भुसावळ येथे अतिरिक्त कारागृहे बांधण्याची प्रक्रिया सुरू असल्याचेही प्रतिज्ञापत्रात म्हटले आहे.

# बंद कारखान्यांच्या आधारे जनतेची दिशाभूल

## ■ सावध राहण्याचे महावितरणचे स्वतंत्र संचालकांचे आवाहन

**मुंबई : प्रतिनिधी**

सर्वाधिक वीजदरामुळे राज्यातील पोलाद कारखान्यांनी पराराज्यात स्थलांतर केले, असा दावा करताना ज्या कारखान्यांचा उल्लेख केला त्यांचे काम आठ ते २३ वर्षांपूर्वीच बंद झाले आहे. २० वर्षांपूर्वी राज्यात बंद झालेल्या कारखान्यांच्या नावांचा वापर करून जनतेची दिशाभूल करणे निषेधार्ह आहे, अशी प्रतिक्रिया महावितरणचे स्वतंत्र संचालक विश्वास पाठक यांनी बुधवारी (दि. २३) व्यक्त केली. विदर्भ इंडस्ट्रीज असोसिएशने सावध रहावे आणि खोटे पसरविणाऱ्या व्यक्तींना आपला प्रतिष्ठीत मंच वापरू देऊ नये, असे आवाहनही त्यांनी केले.



ते म्हणाले की, नागपूरमधील पत्रकार परिषदेच्या वृत्तात ज्या कंपन्यांच्या नावांचा उल्लेख केला आहे त्यांची महावितरणच्या रेकॉर्डमध्ये पडताळणी केली असता, त्या कंपन्यांचा वीजपुरवठा १९९९, २००२, २००३, २००६ साली बंद झाला आहे. या कंपन्यांकडे सव्वीस लाख ते पावणेतीन कोटी रुपयांचे बिलही थकीत आहे. अशा कारखान्यांच्या नावांचा हवाला देऊन स्टील इंडस्ट्री आता राज्याबाहेर चालली असा आभास निर्माण करणे चुकीचे आहे.

राज्यातील कंपन्यांच्या सध्याच्या कामाबद्दलही दिशाभूल करण्यात आली आहे. राज्यात उद्योग बंद पडण्याऐवजी अधिक गतीने चालत आहेत, असे वीजवापरावरून दिसते. ३१ मार्च २०२२ रोजी संपलेल्या २०२१-२२ या आर्थिक वर्षात राज्यात ४,५३,४३८ औद्योगिक ग्राहक होते व त्यांनी ५०,५६३ दशलक्ष युनिट इतकी वीज वापरली होती.

मार्चनंतर गेल्या सहा महिन्यात औद्योगिक ग्राहकांची संख्या दोन हजाराने वाढून ४,५५,२७१ झाली असून त्यांनी सप्टेंबर अखेर सहा महिन्यात २७,७१२ दशलक्ष युनिट इतकी वीज वापरली आहे. आधीच्या वर्षभरातील वीज वापराच्या ५४ टक्के वापर सहा महिन्यात झाला आहे.

उद्योग बंद पडत असते, तर वीजवापर कसा वाढला असता, हा प्रश्न आहे. यामध्ये विशेष नोंद घेण्यासारखी बाब म्हणजे सहापैकी तीन महिने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे सरकार सत्तेवर आहे.

नागरिकांनी व उद्योजकांनी वस्तुस्थितीची नोंद घ्यावी आणि वैयक्तिक हितसंबंधांसाठी दिशाभूल करण्याच्या कोणाच्याही प्रयत्नांना बळी पडू नये, असे आवाहन त्यांनी केले.

# सिडकोच्या ४,१५८ घरांची संगणकीय सोडत जाहीर

**नवी मुंबई : सिडको वृत्तसेवा**

सिडको महामंडळाच्या महागृहनिर्माण योजना ऑगस्ट-२०२२करीता संगणकीय सोडत बुधवारी (दि. २३) सिडको भवन येथे काढण्यात आली. सिडकोतर्फे ३१ ऑगस्ट २०२२ रोजी या गृहनिर्माण योजनेचा प्रारंभ करून नवी मुंबईच्या विविध नोडमधील ४,१५८ घरे विक्रीकरिता उपलब्ध करून देण्यात आली होती.



संगणकीय सोडत प्रक्रियेवर देखरेख करण्याकरिता सिडकोतर्फे सुरेश कुमार, माजी लोकायुक्त यांच्या पर्यवेक्षणाखाली समिती नियुक्त करण्यात आली होती. मोईझ हुसेन हेही या समितीतील सदस्य होते. सोडतीमध्ये घर लाभलेल्या अर्जदारांनी सिडकोमुळे नवी मुंबईसारख्या सोयीसुविधांनी परिपूर्ण शहरात हक्काच्या घराचे स्वप्न पूर्ण झाल्याची भावना या वेळी बोलून दाखवली.

सिडकोतर्फे नवी मुंबईतील द्रोणागिरी, कळंबोली, तळोजा आणि खारघर नोडमधील गृहनिर्माण योजनेतील ४,१५८ घरे विक्रीकरिता उपलब्ध करून देण्यात आली होती. सुमारे १६ हजार अर्ज प्राप्त झाले. सोडतीमध्ये यशस्वी ठरलेल्या अर्जदारांची यादी सिडकोच्या lottery.cidcoindia.com या संकेतस्थळावर उपलब्ध असून अयशस्वी अर्जदारांची अनामत रक्कम १५ दिवसांमध्ये परत केली जाणार आहे.

यशस्वी अर्जदारांचे डॉ. संजय मुखर्जी, उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको यांनी अभिनंदन केले.

# सीकेटी महाविद्यालयात एक दिवसीय कार्यशाळा उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर (सीकेटी) आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, (स्वायत्त) येथे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण अंमलबजावणीची आव्हाने तथा संधी या विषयावर महाविद्यालयाच्या रौप्य महोत्सवानिमित्त उच्च शिक्षण कोकण विभाग, राष्ट्रीय उच्चतर शिक्षण अभियानांतर्गत आणि आयक्यूएसीच्या समन्वयाने एक दिवसीय कार्यशाळा बुधवारी (दि. २३) झाली.

या कार्यशाळेचे उद्घाटन संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आयआयटी येथील भौतिकशास्त्र विभागाचे वरिष्ठ प्राध्यापक प्रो. बी. एन. जगताप, कोकण विभागाचे शिक्षण सहसंचालक डॉ. संजय जगताप, राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियानाचे वरिष्ठ सल्लागार डॉ. पी. एन. पाबरेकर, मुंबई विद्यापीठाचे माजी कुलगुरू प्रो. डॉ. नरेश चंद्रा, उच्च शिक्षणातील संशोधक आनंद अरुण मापुस्कर आणि संस्थेचे सचिव डॉ. एस. टी. गडदे यांच्या उपस्थितीत झाले.

लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी या वेळी त्यांच्या शिक्षण क्षेत्रातला अनुभव सांगितला. भविष्यकाळातील संधी व आव्हाने याबाबत दक्ष राहण्याचे आवाहन केले. महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील यांनी महाविद्यालयाद्वारे संचालित विविध अभ्यासक्रमांचा आढावा घेतला व राष्ट्रीय शैक्षणिक धोरण अंमलबजावणीच्या दृष्टीने सुरू केलेल्या सुविधांची माहिती दिली. प्रो. डॉ. नरेश चंद्रा व डॉ. संजय जगताप यांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण अंमलबजावणीची आव्हाने तथा संधी याबद्दल थोडक्यात माहिती दिली.

प्रथम सत्रात प्रो. बी. एन. जगताप यांनी उच्च शिक्षण क्षेत्राची पुनर्रचना याबाबत माहिती दिली. द्वितीय सत्रात आनंद अरुण मापुस्कर यांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण अंमलबजावणीची आव्हाने व शैक्षणिक, आर्थिक, प्रशासकीय संधी बाबतची माहिती दिली.

प्रथम सत्रात या वेळी अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. बी. डी. आघाव, वाणिज्य शाखेचे प्रमुख प्रा. डॉ. एस. बी. यादव, सूक्ष्मजीवशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा. एन. सी. वडनेरे, इंग्रजी विभागाचे प्रा. एस. एन. परकाळे, राज्यशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा. आकाश पाटील, प्रा. नितीन आरेकर, कला शाखेचे प्रमुख प्रो. डॉ. बी. एस. पाटील उपस्थित होते.

कार्यशाळा यशस्वीरित्या पार पाडल्याबद्दल संस्थेचे चेअरमन रामशेठ ठाकूर, संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, आमदार प्रशांत ठाकूर व संस्थेचे सचिव डॉ. एस. टी. गडदे यांनी आयोजकांचे कौतुक केले.

# कोमसापतर्फे पुस्तक प्रकाशन व काव्यसंध्या

## मान्यवरांकडून साहित्यिकांचे कौतुक; रसिकांचा प्रतिसाद

**मुंबई : प्रतिनिधी**

कोकण मराठी साहित्य परिषद गिरगाव शाखा आणि कला मंच दिवाळी अंक यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवारी (दि.१९) महिला विकास मंडळ कुलाबा येथे पुस्तकांचा प्रकाशन सोहळा आणि काव्यसंध्या आयोजित करण्यात आली होती.

यात जयश्री संगीतराव लिखित 'झाले मोकळे आकाश' या एकांकिका संग्रहाचे, प्रकाशन भरारी प्रकाशनच्या वतीने करण्यात आले, तसेच हेमांगी नेरकर यांच्या 'प्रारब्ध' या काव्यसंग्रहाचे व कलामंच दिवाळी अंकाचे प्रकाशन कोमसापच्या केंद्रीय अध्यक्ष नमिता कीर, विश्वस्त रेखा नार्वेकर आणि मुंबई जिल्ह्याच्या अध्यक्ष लता गुठे यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी व्यासपीठावर कवयित्री गौरी कुलकर्णी मेघना साने ज्योती कपिले उपस्थित होत्या.




नमिता कीर अध्यक्ष भाषणात म्हणाल्या, कोकण मराठी साहित्य परिषद ही संस्था पद्मश्री मधु मंगेश कर्णिक यांच्या मार्गदर्शनाने साहित्यिक चळवळ पुढे घेऊन जात आहे. हेमांगी नेरकर आणि जयश्री ससंगीतराव या दोघीही प्रथितयश साहित्यिका आहेत. हेमांगी यांच्या कवितेचा सूर अस्वस्थ हळवा आहे, तर जयश्री यांनी एकांकिका लेखनाची वाट पहिल्यांदाच पण समर्थपणे पेलली आहे. त्यांनी यापुढे नाटक लिहायला हाती घ्यावे, असेही सुतोवाच केले. कोमसापच्या जिल्हाध्यक्ष लता गुठे ह्या उत्तम प्रकाशिका असून प्रकाशनाची कामगिरी त्या उत्तमरीत्या बजावत आहेत, असेही म्हणाल्या. रेखा नार्वेकर यांनी त्यांच्या मनोगतामधून 'झाले मोकळे आकाश' या पुस्तकाचे विशेष वैशिष्ट्य सांगितले.

कोमसापचे शाखाध्यक्ष मनोज वराडे, पुष्पा कोल्हे, रविकिरण पराडकर, संतोष खाडे, मनोज धुरंदर, मधुमंजिरी गटणे व इतर पदाधिकाऱ्यांनी आपल्या कविता सादर करून कार्यक्रमाची रंगत वाढवली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्मिता आपटे यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जयश्री संगीत राव यांनी केले. आभार नेहा ओक यांनी मानले.

# आवरे शाळेत अज्ञाताकडून साहित्याची नासधूस

**उरण : वार्ताहर**

आवरे येथील रामचंद्र म्हात्रे विद्यालयात मागील काही दिवसांपासून समाजकंटकांनी पंखे आणि इतर सामानाची नासधूस केली आहे. या प्रकारामुळे विद्यार्थी आणि शिक्षकांमध्ये दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

आवरे गावातील रामचंद्र म्हात्रे या विद्यालयात ५वी ते १२वीपर्यंत ८५४ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. मागील काही दिवसांपासून या शाळेतील विद्यार्थी आणि शिक्षक प्रचंड दहशतीखाली आहेत. १७ नोव्हेंबर रोजी काही समाजकंटकांनी रात्री शाळेमध्ये घुसून शाळेतील टेबल जाळला, तसेच शाळेच्या किचनमधील गॅस शेगडी पेटवून त्यावर शाळेतील कागदपत्रे आणि पुस्तके जाळण्यात आली होती. एका नागरिकाला रात्री शाळेत काही जळत असल्याचे दिसल्यानंतर ही आग विझविण्यात आली. त्यामुळे शाळा जळण्यापासून वाचली. याबाबत शाळा प्रशासनाने उरण पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती, मात्र पोलिसांनी दखल घेतली नाही. आता पुन्हा एकदा सोमवारी (दि. २१) रात्री शाळेतील दोन वर्गातील पंखे वाकवून इतर सामानाची नासधूस केली, तसेच पोषण आहारातील धान्य, डाळी याचीही नासधूस केली.


**E-TENDER NOTICE**

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed and registered contractors on MAHATRANSCO E-Tendering website **https://srmetender.mahatransco.in** for the following Tender specification.

| RFx No. | Description | Esti. Cost |
|---|---|---|
| Tend-50/22-23 **RFx No. 7000025038** | Work of AMC for providing, servicing and refilling of Fire Extinguishers at various substations, under Panvel Circle...**Re-tender thereof.** | Rs. 50 Lakhs |

**EMD:** 1% of Estimated Cost **Tender Fee:** Rs. 500/- + GST **Submission of Bids:** From 24.11.2022 to 30.11.2022 up to 23:59 Hrs **Opening Date:** 01.12.2022 @ 11:00 Hrs. For further details, visit our website **https://srmetender.mahatransco.in Contact Person:** The Executive Engineer (Adm), **Call:** 022-27459624, 9769006220. E-mail ID: **se7200@mahatransco.in**

**Sd/-**
**Superintending Engineer**
**EHV (O&M) Circle, Panvel**




**खालापूर : चौक व्यापारी संघटनेच्या अध्यक्षपदी नुकताच निवड झालेल्या हर्षल हनुमंते यांचे भाजप उत्तर रायगड जिल्हा ओबीसी मोर्चा युवा अध्यक्ष प्रसाद म्हात्रे, सोशल मिडिया सेल शहर संयोजक प्रसाद हनुमंते आणि सूर्यकांत पंडित यांनी अभिनंदन केले.**


**महाराष्ट्र शासन**
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,**
**अलिबाग सा.बां. विभाग, अलिबाग**
पिन कोड - ४०२ २०१

ई-मेल पत्ता :- alibag.ee@mahapwd.com दुरध्वनी/फॅक्स क्रमांक :- (०२१४१) २२२०८४/२२५०९६

**ई - निविदा सूचना क्र. २८ सन २०२२-२०२३**

कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, अलिबाग महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकरीता सक्षम कंत्राटदारांकडून (जे निविदेत असलेल्या अटी व शर्ती पूर्ण करतील असे कंत्राटदार) ब-१ नमुन्यातील ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, अलिबाग यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित किंमत रुपये |
|---|---|---|
| १ | रायगड जिल्ह्यातील सुधागड तालुक्यातील फल्याण वावे जांभुळपाडा हारणोली नवघर ठाणाले भार्जे भार्जेवाडी एरळ जामगाव रस्ता प्रजिमा-३८ कि.मी. २७/००० ते ३८/००० लांबीमध्ये सुधारणा करणे. | ६,९५,६५,६१७.०० |
| २ | रायगड जिल्ह्यातील सुधागड तालुक्यातील जांभुळपाडा हारणोली नवघर ठाणाले भार्जे भाजेवाडी एरळ जामगाव रस्ता. प्रजिमा-३८ कि.मी.६/००० ते ८/४०० व १९/००० ते २२/००० लांबीमध्ये सुधारणा करणे. | २,८०,१६,४८५.०० |
| ३ | हमरापूर दादर वशेणी रस्ता. प्रजिमा-२७ रस्त्यावर कि.मी.०/०० ते ५/५०० ते ९/३०० ते ११/३०० मध्ये सुधारणा करणे. ता. पेण, जि. रायगड. | २,८०,३०,९९४.०० |
| ४ | निगडे पाबळ कोंढवी रस्ता प्रजिमा-२४ कि.मी. ०/०० ते ४/३०० मध्ये रस्त्याची सुधारणा करणे. ता. पेण, जि.रायगड | २,४०,९०,२६६.०० |
| ५ | निगडे पाबळ कोंढवी रस्ता प्रजिमा- २४ कि.मी. २०/५०० ते २४/०० मध्ये रस्त्याची सुधारणा करणे. ता. पेण, जि. रायगड | २,४२,७१,१५०.०० |
| ६ | सावरोली खारपाडा रस्ता. रा.मा. १०४ कि.मी. १९/६०० ते २२/०० रस्त्याची सुधारणा करणे. ता. पेण, जि.रायगड ता. पेण, जि. रायगड | २,०४,०६,४७२.०० |
| ७ | सावरोली खारपाडा रस्ता. रा.मा. १०४, कि.मी. २७/८०० ते २८/६०० मध्ये काँक्रीटीकरण करणे. ता. पेण, जि.रायगड ता. पेण, जि. रायगड | २,०२,७८,५४२.०० |
| ८ | वाशी वढाव काळेश्री रस्ता. प्रजिमा- २३ रस्त्यावर कि.मी. ६/५०० ते ८/५०० मध्ये सुधारणा करणे. ता. पेण, जि. रायगड | १,९९,५१,४५९.०० |
| ९ | जाहे रावे कासारभाट रस्ता. प्रजिमा-११ कि.मी. ०/०० ते ४/८०० मध्ये रस्त्याची सुधारणा करणे. ता. पेण, जि.रायगड | २,४७,८१,८५४.०० |

**ई-निविदा उपलब्ध कालावधी** : दिनांक २४/११/२०२२ (स.१०.००) ते दिनांक ०८/१२/२०२२ (सं.१८.००)
**निविदापूर्व बैठक ( अ.क्र. १ ते ३ कामांकरीता )** : मा. मुख्य अभियंता, सा.बां. प्रादेशिक विभाग, कोकण मर्झबान रोड, मुंबई यांचे दालनात दिनांक २९/११/२०२२ रोजी दु. ३.०० वा.
**निविदापूर्व बैठक (अ.क्र. ४ ते ९ कामांकरीता )** : मा. अधीक्षक अभियंता, रायगड (सा. बां.) मंडळ कोकण भवन, नवी मुंबई, यांचे दालनात दिनांक ३०/११/२०२२ रोजी दु. ३.०० वा.
**ई-निविदा उघडणे** : दिनांक १४/१२/२०२२ (दु. ३.०० वा.) (अधिक्षक अभियंता, सा.बां. रायगड, कोकणभवन, नवी मुंबई यांचे कार्यालयात)

खालील संकेतस्थळावर ई-निविदाची सर्व माहिती उपलब्ध आहे.
1. http://mahapwd.com 2. http://mahatenders.gov.in
(सदर निविदेसूचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवरती कळविण्यात येईल.)
३. कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, अलिबाग कार्यालयातील सूचना फलक.

जा.क्र./ सा.बां./ अवि/निविदा/६८६०/२०२२
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
सा.बां. विभाग, अलिबाग - ४०२ २०१
दिनांक :- १४/११/२०२२

**सही/-**
**(ज.ई. सुखदेवे)**
कार्यकारी अभियंता,
सा. बां. विभाग, अलिबाग, जि.रायगड



**जाहीर नोटीस**

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील वर्णन केलेली सदनिका आमचे अशिल **श्री. जिजाबराव वनाजी पाटील** व सौ. सुदेष्णा जिजाबराव पाटील यांनी सदरहु सदनिकेचे मालक **श्रीमती प्रिया राजेश देरा** व ईतर २ यांचेकडुन खरेदी विक्रीचे व्यवहाराने कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरवीले आहे. तरी सदर खालील नमुद सदनिकेची मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरीता प्रस्तुत जाहीर नोटीस प्रसिद्ध करीत आहोत. सदर सदनिकेचे वर्णन खालील प्रमाणे :

**''सदनिकेचे वर्णन''**
**मौजे खारघर, तालुका - पनवेल, जिल्हा - रायगड.**

| इमारतीचे नाव | सदनिका क्र. | मजला | प्लॉट नं. | सेक्टर | क्षेत्र चौ. मी. |
|---|---|---|---|---|---|
| रेल विहार को. ऑ.हौ.सो.लि. | एल-१०१ | पहिला मजला | १ | ४ | ८३.०७ चौ. मी. (कार्पेट) |

**(सबब रेल विहार को. ऑ.हौ.सो.लि. या इमारतीमधील सदर सदनिकेसोबत सदर इमारतीमधील तळमजल्यावरील ओपन कार पार्कींग 'पार्किंग क्र. ३६' याचा समावेश)**

तरी प्राप्त परिस्थितीत वरील वर्णनित सदनिका मिळकतीमध्ये नमूद केलेल्या सदनिकेमध्ये वा कोणत्याही भागावर कोणाही व्यक्तीचे कसल्याही प्रकारचे करार मदार, गहान, दान, बक्षीस, फरोक्त, तारण, भाडेरूपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, अखत्यारपत्र, एम. ओ. यु. वा तत्सम कोणतेही दावे, मालकी व अन्य हक्क हितसंबंध असल्यास त्या व्यक्तींनी वा संबंधीतांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून **''१५ दिवसांचे आत''** आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरूप विषद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्त्यावर लेखी कळवावे अगर समक्ष येवून भेटावे.

वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तकार, दावा न आल्यास सदर सदनिका मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदरचा सदनिका खरेदी-विक्रीचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर आलेल्या हरकती ग्राहय धरल्या जाणार नाहीत तसेच आलेल्या तकारी, दावे हरकती या रद्दबातल आहेत व त्या जाणिवपूर्वक सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरले जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

**सही/-**
**ॲड. प्रशांत परशुराम वाघमारे**
B.L.S., LL.B.

पत्ता:- ऑफिस नं. ११३, पहिला मजला, नगरपालिका शॉपिंग कॉम्प्लेक्स, वासुदेव बळवंत फडके नाटयगृहाजवळ, पनवेल, जि. रायगड. ४१०२०६


पान १ वरून

## स्थानिकांच्या रोजगार, हिताला प्राधान्य द्यावे- मुख्यमंत्री

राज्य शासनाच्या वतीनेही केंद्रीय उद्योग मंत्रालयाला आरसीएफमधील या प्रकल्पबाधितांना सामावून घेण्याबाबत पत्र देण्यात येणार आहे. वाडवली गाव येथील मंदिर, मैदानांची सुविधा उपलब्ध व्हावी आणि आरसीएफने अधिग्रहीत केलेल्या जमिनीवर अतिक्रमण हटवण्याबाबतही चर्चा झाली. आरसीएफच्या मुंबईतील प्रकल्पामुळे न्यू कफ परेड येथील रहिवाशांना होणारा प्रदूषणाचा त्रास रोखण्यासाठी, प्रदूषण नियंत्रणाची मानकांचे काटेकोर पालन तसेच प्रदूषण रोखणारी रिअल टाईम यंत्रणा बसवण्याचे निर्देश देण्यात आले.

डोलवी येथील जेएसडब्लूच्या प्रकल्पात स्थानिकांच्या भरतीबाबतही लवकरच जाहिरात काढण्यात येईल. बंद झालेल्या प्रकल्पातील १२६ उमेदवारांना लवकरच नुकसान भरपाई देण्याचे निश्चित करण्यात आले. भरतीबाबत आणि स्थानिक उमेदवारांच्या भरतीबाबत विविध विभागांनी कंपनीशी समन्वय साधण्याचे कंपनीच्या विस्तार आणि विकासासाठी सहकार्य करण्यात यावे, असेही निर्देश या वेळी देण्यात आले.

## जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेत लोकनेते रामशेठ ठाकूर स्कूलचे यश

१७ वर्षांखालील मुलींच्या वयोगटात लिशा गायधनकर हिने प्रथम तर जान्हवी पवार व कृपा संधा यांनी द्वितीय क्रमांक मिळवला. ६० ते ६३ किलो वजन गटात स्मिता शर्मा हिने प्रथम क्रमांक मिळवला, तसेच १९ वर्षे वयोगटाखालील मुलींच्या स्पर्धेत मनस्वी गोवारी हिने प्रथम तर प्राची गोवारी हिने द्वितीय क्रमांक मिळवला. 'रयत'चे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर व विद्यालयाचे चेअरमन आमदार प्रशांत ठाकूर यांनी सर्व विद्यार्थ्यांचे विशेष कौतुक केले, तसेच रायगड विभाग इन्स्पेक्टर कामोठे रोहिदास ठाकूर व विद्यालयाच्या मुख्याध्यापिका स्वप्नाली म्हात्रे यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. विद्यालयाच्या क्रिडा शिक्षक प्रतिज्ञा पाटील, रुपाली जोगदंड व हितेश कडू यांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन लाभले.

# जेएनपीएमध्ये सागरी गुणवत्तेचे व्यवस्थापन

**उरण : प्रतिनिधी, वार्ताहर**

जेएनपीए हे भारतातील सर्वोत्तम कामगिरी करणारे बंदर आहे. जेएनपीएने आयआयटी मद्रासच्या सिव्हिल इंजिनीअरिंग विभागाच्या सहकार्याने बंदरामध्ये एक सतत सागरी जल गुणवत्ता देखरेख केंद्र (CMWQMS) विकसित केले आहे. यासोबतच बंदरामध्ये विद्युत पर्यावरण निरीक्षण वाहन (EV) सुद्धा लाँच केले. या निरीक्षण केंद्र आणि ई-निरीक्षण वाहनाचे उद्घाटन जेएनपीएचे अध्यक्ष संजय सेठी यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी उपाध्यक्ष उन्मेष वाघ, व सर्व विभागाध्यक्ष उपस्थित होते.



जेएनपीए शाश्वत विकासामध्ये अग्रस्थान साध्य करण्यासाठी आणि आर्थिक, सामाजिक आणि पर्यावरणीय मापदंडांमध्ये वर्णित व्यापारमूल्य निर्माण करण्यासाठी वचनबद्ध आहे. जेएनपीए नेहमीच पर्यावरणीय दृष्ट्या जबाबदार बंदर म्हणून विकसित होण्यासाठी आग्रही आहे. सतत सागरी जल गुणवत्ता देखरेख केंद्र आणि ई-वाहनांचे लाँचिंग हे शाश्वत विकासाच्या वचनबद्धतेच्या दिशेने टाकलेले आणखी एक पाऊल असल्याचे जेएनपीएचे अध्यक्ष संजय सेठी यांनी म्हटले आहे. सतत सागरी जल गुणवत्ता प्रणाली आणि विद्युत निगरानी वाहनामुळे जेएनपीएला बंदर क्षेत्रातील सागरी जल आणि हवेच्या गुणवत्तेचे व्यवस्थापन करण्यासाठी, बंदर क्षेत्रातील पर्यावरणीय गुणवत्तेचे नियमन करण्यास मदत होईल.

याचबरोबर या सुविधेद्वारे, जल गुणवत्ता केंद्रामध्ये संकलित केल्या जाणाऱ्या तापमान, पीएच, विरघळलेला ऑक्सिजन, अमोनिया, कंडक्टिविटी, नायट्रेट, क्षारता यासारख्या माहितीच्या आधारे बंदर परिसरातील पर्यावरणीय गुणवत्तेचे पालन व तपासण्याव्यतिरिक्त वाहनांमुळे निर्माण होणाऱ्या हरित वायुचे प्रमाण कमी करण्यास जेएनपीए सक्षम होईल. सागरी पाण्याचा टीडीएस, सागरी पाण्याच्या गुणवत्तेचा डेटाबेस सागरी वातावरणात स्वच्छता मानके राखण्यासाठी आवश्यक आहे. ई-वाहनांमुळे जेएनपीए मध्ये सुरू असलेल्या परिवेशी वायु गुणवत्ता आणि ध्वनी निरीक्षण क्रियाकलापांना देखील पुष्टी प्राप्त होते.

## देखरेख केंद्र आणि ई-निरीक्षण वाहनाचे उद्घाटन

### विविध पर्यावरणीय उपक्रम

जेएनपीएने विविध पर्यावरणीय सुधारणा आणि हरित बंदर उपक्रम सुरू केले आहेत उदा: सांडपाणी प्रक्रिया संयंत्र, सतत परिवेशी वायु गुणवत्ता देखरेख केंद्र, व्यापक घनकचरा व्यवस्थापन सुविधा, बंदर परिसरात आणि टाउनशिपमध्ये एलईडी दिवे, ई-आरटीजीसीएस, किनार्यावरील वीज पुरवठा, शेवा मंदिर आणि शेवा टेकडीच्या पायथ्याजवळील तलावांचे पुनरुत्थान, सेंट्रलाइज्ड पार्किंग प्लाझा येथे सुलभ वाहतूकीसाठी केलेले उपाय, खारफुटीचे व्यवस्थापन, तेल गळती प्रतिसाद इत्यादीसह पोर्ट ग्रीन कव्हर यासोबतच जवाहरलाल नेहरू पोर्टने सुमारे ४.१० मेगावाट क्षमतेचे सौर पॅनेलदेखील स्थापित केले आहेत. बंदराच्या ३८ टक्के उर्जेची आवश्यकता अक्षय ऊर्जेतुन पूर्ण होते. जेएनपीएने उर्जेचा वापर कमी करण्यासाठी व कार्बन उत्सर्जन कमी करण्यासाठी बंदर परिसरात एलईडी दिवेदेखील लावले आहेत.

# कारची अज्ञात वाहनाला धडक; दोघांचा मृत्यू

**पनवेल, उरण : वार्ताहर**

पनवेल जवळील पळस्पे ते जेएनपीटी जाणाऱ्या मार्गावर पुष्पकनगर ब्रिजवर मध्यरात्रीच्या सुमारास झालेल्या अपघातात मारुती एर्टिगा गाडीतील दोघे जण गंभीररीत्या जखमी होऊन मृत्यू पावल्याची घटना घडली आहे.

अलंकार पाटील (वय ३९, रा. आवरे) हा त्याच्याकडे असलेल्या मारुती एर्टिगा गाडीने पनवेलजवळील पळस्पे ते जेएनपीटी जाणाऱ्या मार्गावर पुष्पकनगर ब्रिजवर मध्यरात्रीच्या सुमारास जात होता. या वेळी रस्त्याचकडेला असलेल्या अज्ञात वाहनाला ठोकर मारून झालेल्या अपघातात हा स्वतः गंभीर जखमी झाला तसेच त्याच्यासोबत असलेला मोहिंदर गावंड (वय ३९, रा. आवरे) हासुद्धा गंभीर जखमी झाला. यात दोघांचाही मृत्यू झाला आहे. या अपघाताची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. शालेय जीवनापासून अतिशय जिगरी दोस्त असलेल्या अलंकार व मोहिंदर यांचा अपघातात मृत्यू झाल्याने आवरे गाव हळहळला व्यक्त करीत आहे.



# भाजप नेते अरुणशेठ भगत यांचा वाढदिवस विविध उपक्रमांनी साजरा

## भानघर येथील वृद्धाश्रमात फळे, धान्याचे वाटप



(छाया : विकास म्हात्रे)

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पक्षाचे पनवेल तालुका अध्यक्ष आणि जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत यांचा वाढदिवस मंगळवारी (दि. २२) विविध सामाजिक उपक्रमांनी साजरा करण्यात आला. त्याअंतर्गत वाढदिवसानिमित्त भानघर येथील वृद्धाश्रमात फळे आणि धान्याचे वाटप करण्यात आले.

भानघर येथे वृद्धाश्रमात शशिकांत दिसले यांच्याकडून धान्याचे वाटप तसेच मयूर कदम, अनिल कोकाटे व विश्वजीत पाटील यांच्याकडून फळांचे वाटप करण्यात आले. या वेळी भाजपचे तालुका सरचिटणीस राजेंद्र पाटील, माजी पंचायत समिती सदस्य भूपेंद्र पाटील, माजी उपमहापौर सीताताई पाटील, ग्रामपंचायत सदस्य सुनील माळी, पनवेल तालुका युवा मोर्चा अध्यक्ष आनंद ढवळे, पनवेल भाजप युवा मोर्चा सरचिटणीस विश्वजीत पाटील, सोशल मीडिया सेल संयोजक राजेश पाटील, शुभ पाटील, भाजप ओबीसी मोर्चा उत्तर रायगड सरचिणीस दशरथ म्हात्रे, माजी सरपंच शांताराम पोपेटा, उपसरपंच रोशन पोपेटा, संजोग पाटील, नारायण मढवी, अनिल कोकाटे, मयूर कदम, रोशन गायकवाड, अविनाश गायकवाड आदी भाजप पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.



पनवेल : भाजप तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांना वाढदिवसानिमित्त भाजप उत्तर भारतीय मोर्चाचे अध्यक्ष अवधेश कुमार महतो आणि पदाधिकारी विपिन सिंह, मनोज साहू, संतोष ऐड, सुनील कुमार, सुदीप, विनोद तिवारी, आदित्य गुप्ता, रामचंद्र, महिला पदाधिकारी दीपा मौर्या, रंजना तिवारी, मिशा स्नेहा, सोनी यादव, अर्चना मिश्रा, मंजू मौर्या, रश्मी सिंह, समाजसेवी मां भारती वेलफेयर फाऊंडेशनचे संस्थापक मनोज कुमार मौर्या आदींनी अरुणशेठ भगत यांचे चित्र भेट म्हणून दिले. या वेळी गव्हाण ग्रामपंचायतीच्या सदस्य योगिता भगत व अन्य भाजप पदाधिकारी उपस्थित होते.



(छाया : योगेश पाटील)

पनवेल : भाजप तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या वाढदिवसानिमित्त उरणचे आमदार महेश बालदी यांच्या आमदार निधीमधून शेलघर येथील रायगड जिल्हा परिषदेच्या शाळेत संगणक आणि प्रिंटर देण्यात आलेल्या साहित्यांचे अनावरण अरुणशेठ भगत यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी अमृत भगत, गव्हाण ग्रामपंचायत सदस्य योगिता भगत, सुधीर भगत, आदित्य भगत, मंदार भगत, सुरज भगत, विवेक भगत, प्रितम भगत, ज्ञानेश्वर म्हात्रे, आशोक पाटील, सुहास भगत, मुख्याध्यापक गोपीनाथ थळे, अशोक पाटील आदी उपस्थित होते.

### अभीष्टचिंतन!

**पनवेल : जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष, अजातशत्रू व्यक्तिमत्त्व अरुणशेठ भगत यांचा वाढदिवस मंगळवारी साजरा झाला. वाढदिवसानिमित्त शेलघर येथे अभीष्टचिंतनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या वेळी काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत, जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे सचिव डॉ. एस. टी. गडदे, कुंडेवहाळचे सरपंच सदाशीव वासकर, गव्हाण ग्रामपंचायतीचे उपसरपंच विजय घरत, तालुका सरचिटणीस राजेंद्र पाटील, जिल्हा उपाध्यक्ष प्रल्हाद केणी, रहिम आदींनी शुभेच्छा दिल्या.**











# 'रोटरी'तर्फे मोहोपाड्यात टाकाऊपासून टिकाऊ उपक्रम

**आपटा : बी. एस. कुलकर्णी**

रोटरी क्लब ऑफ पाताळगंगा तर्फे रसायनी परिसरातील ९ विविध शाळेतील एकूण ७० मुलांनी टाकाऊपासून टिकाऊ या विषयावर एक प्रदर्शन जनता विद्यालय मोहोपाडा येथे मंगळवारी (दि. २२) आयोजित करण्यात आले होते.

या कार्यक्रमामध्ये ग्राम सुधार मंडळाचे अध्यक्ष डॉ. पळणीटकर साहेव व सेक्रेटरी तात्यासाहेब म्हसकर प्रमुख पाहुणे म्हणून उदघाटन सोहळयासाठी उपस्थित होते.

या प्रदर्शनचे परीक्षण करण्यासाठी रवींद्र ओंकार, सहस्त्रबुद्धे सर व सहस्त्रबुद्धे मॅडम उपस्थित होत्या. कार्यक्रमामध्ये जनता विद्यालय इंग्रजी माध्यमचे मुख्याध्यापक श्री. वारे यांनी सहकार्य केले. या कार्यक्रमाला रोटरी क्लब ऑफ पाताळगंगाचे अध्यक्ष अमित शाह, माजी अध्यक्ष बाळकृष्ण होणावळे, गणेश काळे, राजू गायकवाड व अनुराधा होणावळे उपस्थित होत्या.

या कार्यक्रम आयोजित करण्यात ज्यांचे फार मोठे योगदान लाभले ते होणावळे यांचे अध्यक्ष अमित शाह यांनी आभार मानले.



# मोटरसायकल चोर अटकेत

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल रेल्वे स्टेशन परिसरात मोटारसायकल चोरी करणाऱ्या सराईत २ गुन्हेगारास पनवेल शहर पोलिसांनी गजाआड केले असून त्यांच्याकडून चोरलेल्या तीन मोटरसायकली हस्तगत केले आहेत.

गेल्या काही दिवसांपासून पनवेल रेल्वे स्टेशन परिसरात मोटार सायकल चोरी जाण्याचे प्रमाण वाढले होते. यासंदर्भात वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय कादबाने यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक शिंदे व पोलीस निरीक्षक जोशी यांनी या चोरांना पकडण्यासाठी गुन्हे शाखेचे दोन पथके तयार केले. पोलिसांच्या पथकाने या चोरट्यांचा शोध घेतला.

या वेळी त्यांना गुप्त बातमीदारांच्या माहितीच्या आधारे आरोपी वेदांत संदीप अंबावणे (वय २२ वर्षे, रा. रूम नं. २०१, प्रेरणा को. हो.सो., सुकापूर) व अज्ञान अंकुश राठोड (वय २३ वर्षे, रा. ठि. हनुमान मंदिराजवळ, सूकापूर) यांना सापळा रचून ताब्यात घेतले. त्यांच्याकडून तीन विविध गुन्ह्यातील तीन दुचाकी वाहने हस्तगत करण्यात आली आहेत.

# उरण मुळेखंडफाटा येथून तरुणी बेपत्ता

**उरण** : मुळेखंडफाटा येथे राहणारी भक्ती हरेश्वर म्हात्रे (वय २३) ही रविवारी (दि. २०) घरातून कोठे तरी निघून गेली आहे. वडील हरेश्वर कृष्णा म्हात्रे यांनी मुलगी हरविली आहे, अशी माहिती उरण पोलीस ठाण्यात दिली आहे. भक्तीचे केस काळे लांब, नाक सरळ, डोळे मोठे, बांधा मध्यम, चेहरा उभट, उंची पाच फुट पाच इंच, अंगात राखाडी टी शर्ट, गळ्यात सोन्याची चैन त्यात बदामी आकाराचे पॅडल आहे. सोबत मोबाईल (७०४५३८८९४१) आहे. या वर्णनाची तरुणी आढळल्यास उरण पोलीस ठाण्यात अथवा हरेश्वर म्हात्रे ९८२०५८७१७६ यांना कळवावे, असे आवाहन उरण पोलिसांनी केले आहे.

# विद्यार्थ्यांसाठी विमानतळ प्रतिकृतीचे प्रदर्शन; सीकेटी विद्यालयात उपक्रम



**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेलमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) विद्यालय इंग्रजी माध्यमात सोमवारी (दि. २१) इयत्ता पाचवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांना विमानतळाच्या प्रतिकृतीचे दर्शन घडवण्यात आले. हा उपक्रम स्वयं एक्झिबिटर्स या संस्थेतर्फे राबविण्यात आला.

विमानतळाचे कामकाज कसे चालते, विमाने लॅण्ड कशी होतात, टेक ऑफ कसा घेतात विमानांना सिग्नल कसा मिळतो. डोमॅस्टीक आणि इंटरनॅशनल विमानतळ तसेच प्रवासी व मालवाहतूक विमाने यात कोणता फरक असतो? विमानाच्या प्रवासीसंख्येची मर्यादाकाय असते. विमानतळाची सुरक्षा कशी राखली जाते. इत्यादी बाबींचे विस्तृत ज्ञान या संस्थेचे संजय गावडे यांनी विद्यार्थ्यांना दिले. विमानतळांवर भविष्यात निर्माण होणाऱ्या करिअरच्या संधींबाबत विद्यार्थ्यांना जागृत करण्यात आले. साधारण १२०० विद्यार्थ्यांनी या सुसंधीचा लाभ घेतला विद्यालयातर्फे हे प्रदर्शन विद्यार्थ्यांना निशुल्क दाखविण्यात आले.

## संपादकीय

# कर्नाटकी कटकट

दोनच दिवसांपूर्वी सीमा प्रश्नाच्या सोडवणुकीसाठी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सर्वपक्षीय समितीची बैठक घेतली. महाराष्ट्रातील राजकीय पक्षांमध्ये आपसांतील मतभेद कुठल्याही थराला गेले तरी बेळगावच्या एकीकरणाबाबत महाराष्ट्रातील नेते आणि जनता एकजुटीने लढा देतात हा इतिहास कर्नाटकचे मुख्यमंत्री बसवराज बोम्मई विसरले. मुख्यमंत्री शिंदे यांनी आयोजित केलेल्या बैठकीमुळेच बोम्मई यांचे मस्तक फिरले असावे. म्हणूनच त्यांनी जत तालुक्यातील ४० गावांना कर्नाटकात सामील करून घेण्याची भाषा केली असावी.

**काही वर्षांपूर्वी राजधानी दिल्लीमध्ये मराठी नेत्यांना फारसा भाव मिळत नाही असे बोलले जात असे, पण त्यामध्ये तितकेसे तथ्य नव्हते. कारण स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांच्यापासून ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्यापर्यंत अनेक नेत्यांचा दिल्लीदरबारी यथोचित आदर होत असे व अजुनही होतो. परंतु राजकारणाचा प्रश्न आला की महाराष्ट्राला दिल्लीमध्ये झुकते माप कधी मिळाले नाही हे मात्र खरे आहे. याचे ठळक उदाहरण म्हणून बेळगाव प्रश्नाचा उल्लेख करता येईल. गेली साठ वर्षे ज्या प्रश्नाचे घोंगडे भिजत पडले आहे, तो सुटण्याची शक्यता नजीकच्या काळात तरी दिसत नाही. महाराष्ट्र-कर्नाटक सीमावाद सर्वोच्च न्यायालयात पोहचला असून त्याचा तेथेच काय तो अंतिम फैसला होईल. बेळगाव, कारवार, निपाणी, बिदर आणि भालकीसह संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे हा नारा महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेपासून आजतागायत दिला जात आहे. संयुक्त महाराष्ट्राचा तो लढा इतिहासातील एक सोनेरी पान आहे. मराठी भाषिक बहुसंख्येने असलेल्या बेळगावचे स्थान महाराष्ट्रातच हवे हे नैसर्गिक सत्य तेव्हाच्या दिल्लीश्वरांना पचले नाही. हा प्रश्न वर्षानुवर्षे चिघळलेला असतानाच कर्नाटकचे मुख्यमंत्री बसवराज बोम्मई यांनी आता पुन्हा विनाकारण महाराष्ट्राची कुरापत काढली. जत तालुक्यातील ४० गावांच्या ग्रामपंचायतींनी कर्नाटकमध्ये सामील होण्याबाबत ठराव केले असून त्यांचा आम्ही गंभीरपणे विचार करत आहोत असे एक पिल्लू त्यांनी बुधवारी सोडून दिले. ही सरळसरळ कुरापत होती. या ४० गावांना कर्नाटकने पाणी पुरवल्याचा दावादेखील बोम्मई यांनी केला. ही निव्वळ राजकीय धूळफेक आहे हे कोणीही सांगेल. या गावांनी २०१२ साली अशा प्रकारचे ठराव केले होते हे सत्य असले तरी त्याची पार्श्वभूमी लक्षात घ्यायला हवी. दहा वर्षांपूर्वी दुष्काळामुळे हवालदिल झालेल्या जत तालुक्यातील या ग्रामस्थांनी पाण्यासाठी प्रचंड वणवण केली होती. राज्य सरकारकडून कुठलाही प्रतिसाद न मिळाल्याच्या निषेधार्थ या ग्रामपंचायतींनी अशा प्रकारचे ठराव करून राज्य सरकारचे लक्ष वेधले होते. याचा अर्थ त्यांना कर्नाटकात सामील व्हायचे आहे असा काढणे म्हणजे वडाचे साल पिंपळाला लावण्यासारखे आहे. कर्नाटकचे मुख्यमंत्री बोम्मई किंवा त्या राज्यातील अन्य नेत्यांचा महाराष्ट्र-द्वेष कधी लपला नाही. बेळगाव परिसरात कर्नाटकी राज्यकर्त्यांनी वर्षानुवर्षे केलेला अन्याय आणि तेथील मराठी भाषकांच्या विरोधात चालवलेले सूडसत्र संताप आणणारे आहे. बेळगाव प्रश्न सामंजस्याने मिटवण्याऐवजी बोम्मई सरकार सुडाची भाषा करत आहे, परंतु त्यांची कर्नाटकी डाळ महाराष्ट्राच्या कृष्णेच्या पाण्यात कधीही शिजणार नाही हे लक्षात ठेवलेले बरे. सीमाभागामध्ये मराठी अस्मितेवर चालणारा कर्नाटकी वरवंटा थांबवायचा असेल तर त्याला कायद्याची जाण असलेला देवेंद्र फडणवीस यांच्यासारखाच राज्यकर्ता हवा. त्यांच्या नेतृत्वाखाली सीमाप्रश्न धसास लागेल, असा विश्वास संपूर्ण महाराष्ट्राला वाटतो.**

# माणगावात बाळासाहेबांची शिवसेना-मविआमध्ये कांटे की टक्कर

**माणगाव : सलीम शेख**

निवडणूक आयोगाने राज्यातील सात हजार ७०० ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांचा कार्यक्रम नुकताच जाहीर केला. यामध्ये माणगाव तालुक्यातील १९ ग्रामपंचायतीचा समावेश असून २७ नोव्हेंबर २०२२मध्ये मुदत संपणाऱ्या या ग्रामपंचायतीच्या निवडणूकांचे बिगुल वाजले असून तालुक्यात उमेदवार चाचपणीला वेग आला असून तालुक्यात विविध पक्षांनी आपली मोर्चे बांधणी सुरू केली आहे.

राष्ट्रीय काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस व उद्धव बाळासाहेब ठाकरे यांची शिवसेना अशी महाविकास आघाडी असून त्यांचे विरुद्ध शिंदे गटाची बाळासाहेबांची शिवसेना गट अशी सरळ लढत माणगाव लालुक्यात विविध ठिकाणी होणार असून शेतकरी कामगार पक्षही आपले उमेदवार काही ग्रामपंचायतीत निवडणूकीत उतरवणार आहे.

या निवडणुकीचे मतदान १८ डिसेंबर रोजी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० होणार आहे. त्यामुळे तालुक्यातील १९ ग्रामपंचायत निवडणुकीच्या निकालाकडे सर्वांचे लक्ष लागणार आहे. ग्रामपंचायती निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची मुदत २८ नोव्हेंबर २०२२ ते २ डिसेंबर २०२२ सकाळी ११ ते दुपारी ३ अशी आहे. उमेदवारी अर्ज छाननी ५ डिसेंबर, उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत १७ डिसेंबर असून १८ डिसेंबर रोजी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत मतदान होणार आहे. २० डिसेंबर रोजी मतमोजणी होणार आहे. याकडे सर्व पक्ष श्रेष्टींचे लक्ष लागून राहिले आहे.




जाहीर झालेल्या ग्रामपंचायत निवडणुकांमध्ये माणगाव तालुक्यातील भागाड, साई, चिंचवली, न्हावे, मुठवली तर्फे तळे, शिरवली तर्फे निजामपूर, करंबेळी, डोंगरोली, गोरेगाव, होडगाव, कुमशेत, दहिवली कोंड, मांगरूळ, पहेल, हरकोल, नांदवी, पळसप, कुंभे, टोळखुर्द या १९ ग्रामपंचायतीचा समावेश असून या ग्रामपंचायती महत्त्वाच्या असून सर्वच पक्षाचे नेते या ग्रामपंचायतीवरील वर्चस्वासाठी व्युव्हरचना करीत आहेत.

# राष्ट्रवादीच्या सरपंचाने भाजपत प्रवेश केल्याने रंगत

### तळामध्ये एकमेव राहटाड ग्रामपंचायत निवडणूक

तळा तालुक्यातील २७ नोव्हेंबर २०२२ मध्ये मुदत संपणाऱ्या राहटाड या एकमेव ग्रामपंचायतीची सार्वत्रिक निवडणूक १८ डिसेंबर रोजी जाहीर झाली आहे. या ग्रामपंचायतीचे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सरपंच यांनी भाजपमध्ये प्रवेश केल्याने या ग्रामपंचायतीच्या निवडणुकीत विशेष रंगत निर्माण झाली असून उमेदवार चाचपणीला वेग आला असून विविध पक्षांनी आपली मोर्चे बांधणी सुरू केली आहे.

राहटाड ग्रामपंचायत मागील निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसच्या ताब्यात गेली होती. दोन महिन्यांपूर्वी या ग्रामपंचायतीच्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या सरपंचानी भाजपत प्रवेश केल्याने डिसेंबर महिन्यात होणाऱ्या या ग्रामपंचायतीच्या निवडणुकीकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष वेधून आहे. सद्यस्थितीत देशात व राज्यात भाजपची सत्ता आहे.राज्यात भाजप बरोबर शिंदे गटाची बाळासाहेबांची शिवसेना सोबत असल्याने सत्तेचा फायदा भाजप व मित्रपक्षाला मिळण्याचे शक्यता आहे. राहटाड ग्रामपंचायतीत भाजप-शिंदे गट बाळासाहेबांची शिवसेना विरुद्ध राष्ट्रीय काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस व उद्धव बाळासाहेब ठाकरे यांची शिवसेना अशी महाविकास आघाडी असून यांच्यात सरळ लढत होणार आहे. या निवडणुकीसाठी मतदान १८ डिसेंबर रोजी सकळी ७.३० ते सायंकाळी ५.३० होणार आहे.

ग्रामपंचायत निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची मुदत २८ नोव्हेंबर २०२२ ते २ डिसेंबर २०२२ सकाळी ११ ते दुपारी ३ अशी आहे. उमेदवारी अर्ज छाननी ५ डिसेंबर, उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत १७ डिसेंबर असून १८ डिसेंबर रोजी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत मतदान होणार आहे. २० डिसेंबर रोजी मतमोजणी होणार आहे. राहटाड ग्रामपंचायतीच्या निवडणुकीकडे संपूर्ण तळा तालुक्यासह रायगड जिल्ह्याचे लक्ष वेधून आहे.

# शिखांचे गुरु तेगबहादूर यांचा आज स्मृतिदिन

गुरू तेगबहादूर यांचा २४ नोव्हेंबर १६७५ हा स्मृतिदिन आहे. औरंगजेबाने चांदणी चौकात गुरु तेगबहादूरांचा शिरच्छेद केला. शिखांचा प्रारंभीचा इतिहास हा सगळा संघर्षमय आणि रक्तरंजित आहे. शिखांच्या धर्मगुरुंचे ज्वलंत आणि तेजोमय चरित्र हा शिखांचा मोठाच स्फूर्तिदायक ठेवा होय.



सहावे शीखगुरू हरगोविंद यांचे गुरु तेग बहादुर सर्वांत धाकटे पुत्र होते. गुरु तेगबहादुर सिंह हे शिखांचे नववे गुरू होते. त्यांचा जन्म १८ एप्रिल १६२१ रोजी पंजाबमधील अमृतसर येथे झाला होता. शिखांचे आठवे गुरू हरकिशन यांच्या मृत्युनंतर १६६४ मध्ये तेगबहादुर यांना नववे गुरू म्हणून शिखांनी गादीवर बसविले.

गुरु तेगबहादूर सिंहजी धार्मिक प्रचारासाठी आपल्या अनुयायांसह विविध ठिकाणी यात्रा करत असत. तेगबहादुरांनी आसामपासून काश्मीरपर्यंत आपल्या धर्माचा प्रसार करून अनेक हिंदुंना व मुसलमांनानाही शीख धर्माची दीक्षा दिली. औरंगजेबला अर्थातच हे खपले नाही. त्या काळात काश्मिरी पंडितांना औरंगजेबाच्या जुलमी सत्तेने हैराण करुन सोडले होते. औरंगजेब हिंदूंना सक्तीने मुस्लिम बनवत होता. मुसलमान होईपर्यंत कुणाही हिंदूंचा छळ केला जाई. हिंदू स्त्रियांना भ्रष्ट केले जाई. हिंदूंची मालमत्ता बळकावणे वा नष्ट करणे नेहमीच चालत असे. त्याने काश्मीरच्या सुभेदारास तेथील सर्व हिंदूंना मुसलमान करण्याचा आदेश दिला. छळ-कपटाची परिसीमा गाठली होती. ते काश्मिरी पंडित गुरु तेगबहादूर यांना शरण गेले. अशा वेळी तेगबहादुरांनी हिंदूंचे नेतृत्व केले. गुरु तेगबहादूरांनी औरंगजेबाला निरोप पाठवून 'आधी तेगबहादूरांना मुसलमान कर मग सगळे काश्मिरी पंडित मुसलमान होतील', असे कळविण्याची व्यवस्था केली. यानंतर औरंगजेबाच्या फौजेने गुरु तेगबहादूरांना अटक केली.

औरंगजेबाच्या दरबारात गेल्यानंतर त्यांना वेग-वेगळ्या प्रकारे आमिष दाखवण्यात आले. गुरु तेगबहादुर यांनी इस्लाम धर्म स्वीकारावा यासाठी औरंगजेबाने त्यांना राजसभेत उच्च पदे देण्याची अनेक प्रलोभने दाखवली, परंतु गुरु तेग बहादुरजींनी त्याला नकार दिला. त्यानंतर त्यांना त्रास देण्यात आला. त्यांना कैद करून घेण्यात आले. गुरु तेगबहादुर प्रतिज्ञेपासून विचलित करण्यासाठी त्यांच्यासमोर भाई मतिदास यांच्या शरिराचे करवतीने कापून तुकडे तुकडे केले. भाई दयाळला उकळत्या तेलाच्या कढईत टाकले, तरीही ते विचलित झाले नाहीत. या दोन शिष्यांना मारून गुरु तेगबहादुरजी यांना घाबरवण्याचा प्रयत्न करण्यात आला पण ते घाबरले नाही. यानंतर दिल्लीच्या चांदनी चौकात गुरु तेग बहादुरजी यांचे शीश कापण्याचा हुकूम दिला आणि २४ नोव्हेंबर १६७५ रोजी धर्माच्या रक्षणासाठी बलिदान दिले. तेगबहादुरांचे बलिदानस्थान आज 'सीसगंज गुरुद्वारा' म्हणून प्रसिद्ध असून पवित्र मानले जाते.

**(साभार : डेस्ट्राईक वर्ल्डप्रेस)**




# व्हॉट्सअ‍ॅपवर सहज रेकॉर्ड करता येणार व्हिडीओ कॉल




व्हॉट्सअ‍ॅप हे जगातील सर्वांत लोकप्रिय मेसेजिंग एप्सपैकी एक आहे. व्हॉट्सअ‍ॅपच्या माध्यमातून युजर्स केवळ मेसेजच पाठवू शकत नाहीत तर ऑडिओ आणि व्हिडीओ कॉलही करू शकतात. मात्र युजर्स व्हिडीओ कॉल रेकॉर्ड करू शकत नाहीत. आज आम्ही तुम्हाला अशाच एका ट्रिकबद्दल सांगणार आहोत, ज्याद्वारे तुम्ही सहज व्हॉट्सअ‍ॅप कॉल रेकॉर्ड करू शकता.

विशेष म्हणजे तुम्ही तुमच्या अँड्रॉईड किंवा आयफोन या दोन्ही उपकरणांमध्ये व्हॉट्सअ‍ॅप व्हिडीओ रेकॉर्ड करू शकता. व्हॉट्सअ‍ॅप व्हिडिओ कॉल डाऊनलोड करण्यासाठी, तुम्हाला फक्त दठशलीवशी हे एप डाऊनलोड करावे लागणार आहे. व्हॉट्सअ‍ॅप हे संवाद साधण्याचं अत्यंत प्रभावी माध्यम आहे.

सर्वप्रथम तुमच्या अँड्रॉईड फोनवर गुगल प्ले स्टोअर ओपन करा. यानंतर येथे XRecorder अ‍ॅप डाऊनलोड करा. यानंतर, आवश्यक परमीशन देऊन पुढे जा. आता तुम्हाला स्क्रीनवर रेकॉर्डिंगचा पर्याय मिळेल. येथून तुम्ही व्हिडीओ कॉल रेकॉर्ड करू शकता.

सर्वप्रथम, ज्या युजर्सचा कॉल तुम्हाला रेकॉर्ड करायचा आहे, त्याला व्हॉट्सअ‍ॅपवर व्हिडीओ कॉल करा, त्यानंतर तळाशी असलेले स्वाइप बटण दाबा. येथे सेटिंगमध्ये जाऊन 'कंट्रोल सेंटर' वर जा. येथे तुम्हाला तुमची स्क्रीन रेकॉर्ड करण्याचा पर्याय दिसेल. आता त्यावर क्लिक करा. तुम्ही त्यावर क्लिक करताच, तुमच्या डिव्हाइसवर व्हॉट्सअ‍ॅपकॉल रेकॉर्डिंग सुरू होईल.

इन्स्टंट मेसेजिंग प्लॅटफॉर्मने आपल्या युजर्ससाठी कॅप्शन मोड जारी केला आहे. सध्या ते डेस्कटॉप बीटा टेस्टर्ससाठी उपलब्ध आहे. युजर्स या फीचरद्वारे डॉक्युमेंट, जीआयएफ, फोटो आणि व्हिडीओ पाठवू शकतील तसेच त्यात कॅप्शन जोडू शकतील. कंपनी सध्या या फीचरची चाचणी करत आहे.

व्हॉट्सअ‍ॅपआपल्या डेस्कटॉप युजर्ससाठी एक नवीन फीचर आणणार आहे. मीडिया रिपोर्ट्सनुसार, कंपनी सध्या या फीचरवर काम करत आहे. या फीचरला स्क्रीन लॉक म्हणतात, हे फीचर प्रत्येक वेळी युजर्स एप्लिकेशन ओपन करेल तेव्हा पासवर्ड विचारेल. एका हिंदी वेबसाईटने याबाबतचे वृत्त दिले आहे.

# ...म्हणून साजरी करतात देव दीपावली

मार्गशीर्ष महिना आजपासून सुरू होत आहे. त्या महिन्याच्या पौर्णिमेस किंवा मागेपुढे मृगशीर्ष नक्षत्र असते. केशव ही त्या महिन्याची अधिदेवता आहे. याच दिवशी दिवसाच्या उत्तरार्धात सूर्य वृश्चिक राशीतून धनु राशीत प्रवेश करणार आहे. यालाच काही ठिकाणी धनुर्मास म्हटले जाते. मार्गशीर्ष महिन्याचा पहिलाच दिवस म्हणजे देवदिवाळी किंवा मोठी दिवाळी. देव दीपावली का साजरी करतात? देव दिवाळीचे महत्त्व, मान्यता यांविषयी जाणून घेऊया...



ग्रामदैवतांना भजण्याचा दिवस म्हणजे देव दीपावली. या दिवशी प्रामुख्याने वडे-घारग्यांचा किंवा आंबोळीचा नैवेद्य दाखवला जातो. कुटुंबातील कुळाचार, कुळधर्म, परंपरांनुसार, नैवेद्यांची संख्या वेगवेगळी असते. गावातील मुख्य देवता, उपदेव-देवता महापुरुष, वेतोबा, ग्रामदेवता इत्यादींना नैवेद्य दाखवले जातात. त्याचबरोबर काही कुटुंबांत पितरांसाठीही वेगळा काकबळी बाजूला काढून ठेवतात. त्यामुळे नैवेद्याच्या पानांची संख्या सतरा, चोवीस, नऊ अशी कोणतीही असते. उत्तर भारतात गंगेच्या घाटांवर दिव्यांची आरास करून हा सण मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. या दिवशी बळीच्या राज्यातून श्रीविष्णू आपल्या मूळ स्थानी परत आले, अशीही समजूत प्रचलित आहे.

**निमित्त**

मार्गशीर्ष शुद्ध प्रतिपदेपासून शुद्ध षष्ठीपर्यंत चंपाषष्ठीचे नवरात्र असते. यालाच मार्तंडभैरव षड्रात्रोत्सव असे म्हटले जाते. मणी-मल्लासूर दैत्यांचा संहार करण्यापूर्वी श्रीशंकराने 'मार्तंडभैरव' अवतार धारण केला. या युद्धात विजयासाठी सप्तर्षींनी एक प्रतिष्ठान स्थापले व त्यावर ते रोज एक माळा वाढवली गेली. सरतेशेवटी शंकराचा विजय झाला. म्हणून देवांनी मार्तंडभैरवावर भंडारा उधळला, त्यावर चंपा फुलांची वृष्टी केली तो दिवस शुद्ध षष्ठीचा होता. म्हणून चंपाषष्ठीला नवरात्र उठते, अशी कथा सांगितली जाते. खंडोबा कुलदैवत असलेल्या कुटुंबांमध्ये मार्गशीर्ष शुद्ध प्रतिपदा ते मार्गशीर्ष शुद्ध षष्ठीपर्यंत चंपाषष्ठीचे नवरात्र असते. चंपाषष्ठीला देवांची पूजा करून नैवेद्य दाखवतात व नंतर नवरात्र उठते. त्या सहा दिवसांत मल्हारी माहात्म्य पठण केले जाते.

एका पौराणिक कथेनुसार, त्रिशंकूला राजर्षी विश्वामित्राने आपल्या सामर्थ्याने स्वर्गात नेले. सगळे देवता फार चिडले आणि त्यांनी त्रिशंकूला स्वर्गातून हाकलून दिले. यामुळे संतप्त झालेल्या विश्वामित्राने आपल्या सामर्थ्याने पृथ्वी आणि स्वर्गापासून मुक्त असे एक नवीन विश्व निर्माण करण्यास सुरू केले. संपूर्ण सृष्टी यामुळे हादरली. सर्वत्र गोंधळ व्हायला लागला. या गोंधळलेल्या सर्व देवांनी राजर्षी विश्वामित्र यांना विनवणी केली. महर्षी प्रसन्न झाले. नवीन विश्व निर्माण करण्याचे संकल्प त्यांनी मागे घेतला. सर्व देव आणि ऋषीमुनी आनंदी झाले पृथ्वी, पाताळ, स्वर्गात सर्व जागी दिवाळी साजरी केली गेली. ही घटना पुढे देव दिवाळी म्हणून साजरी केली जाऊ लागली, असे सांगितले जाते.



**क्लिक...क्लिक...!**



**पनवेल : मार्गशीर्ष महिन्यातील गुरुवारी घरोघरी करण्यात येणाऱ्या पूजेकरिता लागणाऱ्या साहित्याने बाजारपेठ फुलली आहे. बुधवारी साहित्य खरेदीसाठी महिलांनी बाजारात गर्दी केली होती.** (छाया : लक्ष्मण ठाकूर)

## आरोग्य प्रहर

# हिवाळ्यात हळदीचे गरम दूध पिण्याचे भरपूर फायदे

भारतात हिवाळा हा रोगप्रतिकारक शक्ती वाढविण्याचा काळ मानला जातो. हिरव्या पालेभाज्या, ताजी फळं मोठ्या प्रमाणात उपलब्ध असल्याने अनेक पदार्थ बनविण्याचे पर्याय उपलब्ध असतात. याशिवाय हळदीचे दूध भारतात शतकानुशतके प्याले जाते. विशेषतः हिवाळ्यात हळदीचे दूध पिण्याचे अनेक आरोग्यदायी फायदे आहेत. हळदीच्या दुधामुळे रोगप्रतिकारक शक्ती मजबूत होते आणि शरीराला संसर्गाशी लढण्याची शक्ती मिळते. सर्दी, फ्लू, खोकला यांसारखे संसर्ग हिवाळ्यात सर्वांनाच त्रास देतात. यावर हळदीचे दूध फायदेशीर आहे.



हळदीचे दूध नैसर्गिकरित्या दाहक-विरोधी आणि अँटिऑक्सिडंट्सने भरलेले असते. हळदीमध्ये असलेले कर्क्युमिन नावाचे संयुग आपल्या आरोग्याला अनेक प्रकारे फायदेशीर ठरते.दुधात हळद मिसळून प्यायल्याने रोगप्रतिकारशक्ती वाढते, ज्यामुळे हृदयविकार आणि इतर आजारांचा धोका कमी होतो. हाडांसोबतच त्वचेच्या आरोग्यासाठीही ते उत्कृष्ट असल्याचे सिद्ध होते.

हळदीच्या दुधामुळे पचनाला फायदा होतो. ज्यांना लॅक्टोज असहिष्णु आहे त्यांनी बाजारात उपलब्ध हळदीच्या दुधाऐवजी घरगुती हळदीचे दूध वापरून पहावे, परंतु हे लक्षात ठेवा की ते गरमच प्यावे. हळदीचे दूध मेंदूच्या कार्याला चालना देते. कर्क्यूमिनचा मेंदूवर होणारा परिणाम अनेक संशोधनांमध्ये दिसून आला आहे.

कर्क्युमिनचा मेंदू-व्युत्पन्न न्यूरोट्रॉफिक घटक (BDNF) शी जोडला गेला आहे, कारण ते त्याचे स्तर वाढवते. BDNF मेंदूला नवीन कनेक्शन बनविण्यात मदत करते आणि मेंदूच्या पेशींच्या वाढीस प्रोत्साहन देते.

हळदीमध्ये असलेले कर्क्यूमिनदेखील मूड वाढवण्याचे काम करते. क्युरक्यूमिनचा प्रभाव अँटीडिप्रेसस सारखाच असतो हे अनेक संशोधनांमध्ये दिसून आले आहे.

हळदीचे दुःख बनविण्याची योग्य पद्धत कोणती आहे ते आपण जाणून घेऊया. यासाठी प्रथम एका भांड्यात दूध टाकून गॅसवर ठेवा आणि नंतर त्यात चिमूटभर हळद टाका. ते गरम झाल्यावर ग्लासमध्ये ओतून प्या. या दुधात हळदीशिवाय वेलचीचे दाणे, काळी मिरी पावडर, लवंग, दालचिनी इ.ही टाकू शकता. गर्भवती महिलांनी हे दूध डॉक्टरांच्या सल्ल्याने प्यावे.

हळदीचे दूध नेहमी कोमट प्यावे आणि तेही झोपण्यापूर्वी प्यावे असा सल्ला आहार तज्ज्ञांनी दिला आहे. असे मानले जाते की, हळदीचे दूध झोप येण्यास मदत करते. निद्रानाशाचा त्रास असल्यास झोपण्यापूर्वी हळदीचे कोमट दूध अवश्य प्यावे. तुम्हाला तुधाची ऍलर्जी असेल तर तुम्ही ताकात हळद घालून दूध पिऊ शकता.

# अपुऱ्या पाणीपुरवठ्याने खोपोलीकर हैराण

## नगर परिषदेची हक्काची व्यवस्था हवी; नागरिकांची मागणी

**खोपोली : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात नामवंत असलेल्या खोपोली शहरात अपुऱ्या पाणीपुरवठ्याने नागरिक त्रस्त झाले असून, नियोजनाअभावी पाणी संकटाला सामोरे जाण्याची वेळ आल्याने शहरात सध्या सर्वत्र नगर परिषद प्रशासनाच्या विरोधात असंतोष खदखदत आहे. सध्या शहराच्या वेगवेगळ्या भागातील शिष्टमंडळे पाणी समस्यांबाबत तक्रारी करण्यासाठी येत असल्याने नगर परिषद अधिकारीही हवालदिल झाले आहेत.

खोपोली शहराची नवीन पाणीपुरवठा योजना नऊ कोटीवरून २५ कोटींच्या घरात गेली तरी, नगर परिषद खोपोलीकरांना पिण्यासाठी पुरेसे पाणी पुरवू शकली नाही, अशी खंत सर्वत्र व्यक्त करण्यात येत आहे.

नवी मुंबईला पाणीपुरवठा करणारे मोरबे धरण खालापूर तालुक्यात आहे. तर याच तालुक्यातील खोपोली शहराला पाणीपुरवठा करण्यासाठी नगर परिषदेचा स्वतःचा तलाव नाही. आतापर्यंत टाटा पॉवरने वीज





निर्मिती केल्यानंतर विसर्ग केलेल्या पाण्यावरच खोपोलीकरांना अवलंबून राहावे लागत आहे. पण भविष्यात जर टाटा पावरने पाणी सोडले नाही तर काय करणार? असा यक्ष प्रश्न सध्या खोपोलीकरांना भेडसावत आहे.

खोपोली नगर परिषद हद्दीतील मेळ गावाच्या परिसरात नियोजित तलावासाठी जागा पाहण्यात आली होती. पण ती जागा ताब्यात घेण्यास विलंब झाला आणि आता त्या जागेवर मोठ्या प्रमाणात अतिक्रमणे वाढत आहेत तसेच खालापूर तालुक्यातील नियोजित जांभरुख धरणाची फाईल लालफितीत अडकली आहे. जांभरुख धरणाचे काम मार्गी लागले तर खोपलीकरांच्या पाण्याचा प्रश्न सुटू शकतो, अशी जोरदार चर्चा आहे.

अलीकडेच टाटा पॉवरकडून विसर्ग होणाऱ्या पाण्याचे प्रमाण कमी झाल्यामुळे साठवण करणाऱ्या वीरेश्वर तलावाची पाणीपातळी कमी झाली आणि त्यानंतर पाणी समस्येचे संकट खोपोलीकरांवर आले.

शहरात सर्वत्र पाणी समस्येबाबत आरडाओरड सुरू झाल्यानंतर मात्र नगर परिषद प्रशासन खडबडून जागे झाले. त्यानंतर अधिकाऱ्यांच्या मंत्रालय वाऱ्याही सुरू झाल्याची अधिकृत माहिती मिळत आहे.

दरम्यान, या गंभीर समस्येबाबत मुख्याधिकारी अनुप दुरे, टाटा पॉवरचे अधिकारी अभिजीत पाटील, माजी नगराध्यक्ष दत्ताजी मसुरकर, माजी नगरसेवक मनीष यादव, सामाजिक कार्यकर्ते लक्ष्मण रेड्डी, नगर परिषदेच्या पाणीपुरवठा विभागाचे प्रमुख विनय शिपाई व काही स्थानिक ग्रामस्थ यांनी वरची खोपोली येथील पाताळगंगा नदीच्या उगमस्थानी पाहणी दौरा केला. या पाहणी दौऱ्यात अनेक गोष्टी पहावयास मिळाल्या. देणाऱ्याचे हात हजार पण दुबळी माझी झोळी या म्हणीचा प्रत्येय आला.कारण टाटा पॉवरकडून सोडण्यात येणारे पाणी पुरेशा प्रमाणात उचलले जात नसल्याचे दिसून आले. तसेच जलवाहिन्यांना अनेक ठिकाणी गळती असल्याचे समोर आले. त्यामुळे पाण्याचा पुरेसा साठा वीरेश्वर तलावात जात नसल्याची बाब समोर आली. जर गळती काढण्यात आली तर खोपोलीला मुबलक पाणी मिळू शकते, अशी चर्चा यादरम्यान ग्रामस्थांकडून झाली.

पाताळगंगा नदीच्या उगमस्थानी बांधण्यात आलेला बंधारा दोन फूट वाढविण्यात यावा, अशी नगर परिषद प्रशासनाकडून टाटा पॉवरला विनंती करण्यात आली. मात्र अधिकाऱ्यांनी त्याबाबत होकार न दिल्यामुळे याबाबत टाटा पॉवरच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांबरोबर चर्चा करण्याचे यावेळी ठरले.

# स्वच्छतेमुळे नागरिकांचे जीवनमान बदलले-शुभांगी नाखले

**अलिबाग : जिमाका**

स्वच्छ भारत अभियानामुळे गावांचा चेहरा मोहरा बदलला आहे. स्वच्छतेमुळे गावामध्ये लोकांचे जीवनमान बदलले आहे तसेच आर्थिक, पर्यावरणीय आरोग्यमान देखील उंचावले आहे. शौचालयांचा नियमित वापर झाल्यामुळे गावात स्वच्छतेचे वातावरण टिकून आहे, त्यात सातत्य ठेवावे, असे आवाहन रायगड जिल्हा परिषदेच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी शुभांगी नाखले यांनी अलिबाग तालुक्यातील सहाण येथे केले.

रायगड जिल्हा परिषदेच्या जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्षातर्फे जागतिक शौचालय दिनानिमित्त विविध उपक्रम राबविण्यात आले. अलिबाग तालुक्यातील सहाण ग्रामपंचायतीला रायगड जिल्हा परिषद पाणी व स्वच्छता विभागाच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी शुभांगी नाखले यांनी भेट दिली. ग्रामसेविका सोनाली नाईक यांनी गावातील स्वच्छताविषयक कामांची माहिती दिली. या वेळी काही ग्रामस्थांच्या घरातील वैयक्तिक शौचालयांची पाहणी करण्यात आली. त्यावेळी उपमुख्य कार्यकारी अधिकारी शुभांगी नाखले बोलत होत्या. गावात नियमित स्वच्छता राहावी, म्हणून आता सर्व ग्रामपंचायतींनी सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापन व प्लास्टिक बंदीसाठी प्राधान्य द्यावे, अशा सूचना त्यांनी या वेळी दिल्या.

उपमुख्य कार्यकारी अधिकारी शुभांगी नाखले यांनी सहाणगोटी येथील प्राथमिक शाळेला भेट देऊन विद्यार्थी व शिक्षकांशी संवाद साधला. मुख्याध्यापिका दिपाली डोलकर यांनी विद्यार्थ्यांना स्वच्छतेची शपथ दिली. जागतिक शौचालय दिनाच्या निमित्ताने ग्रामस्थांनी शौचालयांसमोर रांगोळी काढली होती. फुलांचे हार घालून शौचालयाचे पूजन करण्यात आले. तर शौचालयाची रंगरंगोटी करून शौचालयांचा वाढदिवस साजरा करण्यात आला.

सहाण ग्रामपंचायतीच्या उपसरपंच सौंदर्या पोईलकर, माजी पंचायत समिती सदस्य अनिल पाटील, ग्रामपंचायत सदस्य नरेश वर्तक, निवेदिता पाटील व विद्या मगर, जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्षाचे संवादतज्ज्ञ सुरेश पाटील, समाजशास्त्रज्ज्ञ रविकिरण गायकवाड, सनियंत्रण व मूल्यमापन तज्ज्ञ दत्तात्रय नाईक आदी उपस्थित होते.

# रोह्यात रेल्वेच्या जलद गाड्यांना थांबा नसल्याने

## प्रवाशांची गैरसोय, पॅसेंजर गाडीला जलद गाडीचे तिकीट




**रोहे : प्रतिनिधी**

कोकण रेल्वे मार्गावरून धावणाऱ्या जलद गाड्यांना रोहा येथे थांबा नसल्याने परिसरातील प्रवाशांची गैरसोय होत आहे. महाराष्ट्र रेल्वे प्रवासी महासंघ व मनसेच्या माध्यमातून जलद गाड्यांना रोहा येथे थांबा मिळवा, यासाठी निवेदन देण्यात आले आहे. परंतु त्याबाबत रेल्वेकडून अद्याप सकारात्मक निर्णय घेण्यात आलेला नाही.

कोरोना पुर्वी रोह्यात नेत्रावती, मत्स्यगंधा या रेल्वे गाड्या थांबत होत्या. कोरोना काळात त्या बंद करण्यात आल्या. आता या गाड्या पुर्ववत धाऊ लागल्या आहेत. त्या रोह्याला थांबतात. मात्र या स्थानकात त्यांचे तिकीट मिळत नाही.

रोहा हे मध्य रेल्वेचे शेवटचे स्थानक तर रोह्याहुन कोकण रेल्वे सुरु होते. येथे गार्ड व गाडी आणणारे संबंधीत अधिकारी बदलतात. त्यामुळे कोकण रेल्वेच्या बहुतांशी गाड्यांना रोह्यात टेक्नीकल थांबा आहे. कमर्शिअल थांबा नाही. परिणामी रोह्यातून बाहेर जाणाऱ्या प्रवाशांना थेट पनवेल गाठावे लागते. दिवा–सावंतवाडी ही गाडी पॅसेंजर गाडी होती. त्या गाडीला आता रोहे येथून तिकीट मिळत नाही.

रोहा हे रायगड जिल्ह्याचे मध्यवर्ती ठिकाण आहे. पर्यटनासाठी प्रसिद्ध असलेल्या मुरूड, काशीद, पाली, रेवदंडा, अलिबाग, तळा या ठिकाणी जाण्यासाठी रोहा हे मध्यवर्ती ठिकाण असल्याने रेल्वेने जलद गाड्यांना रोह्यात थांबा देणे आवश्यक आहे.

रोह्यातून ज्या पॅसेंजर गाड्या सुटतात व येतात त्या गाड्यांना पॅसेंजर ऐवजी एक्स्प्रेस व मेल गाड्यांचे टिकीट दिले जाते. त्यामुळे येथील प्रवाशांना अतिरिक्त आर्थिक भुर्दंड सोसावा लागत आहे.

**रोह्यात टेक्नीकल थांबा असलेल्या गाड्यांना कर्मशिअल थांबा देण्यात यावा, कोरोना काळात पॅसेंजर गाडीचे वाढलेले टिकीट पुर्ववत करावे, रोह्याकडे येण्यासाठी दिवा येथून सकाळी ९ वाजता गाडी सोडावी.**

**–सूर्यकांत वाघमारे, अध्यक्ष, महाराष्ट्र रेल्वे प्रवासी महासंघ–रायगड**


# वारे ग्रामपंचायत हद्दीतील विजेच्या खांबावर २४ तास दिव्यांचा प्रकाश

**कर्जत : प्रतिनिधी**

तालुक्यातील वारे ग्रुपग्रामपंचायत हद्दीतील सर्व गावांमध्ये पथदिव्यांची व्यवस्था करण्यात आली आहे. मात्र महावितरणकडून सार्वजनिक वीज वितरण करण्यासाठी आवश्यक असलेली वीजवाहिनी टाकण्यात आलेली नाही. त्यामुळे तेथील विजेच्या खांबावरील दिवे २४ तास दिवस–रात्र सुरू असतात.

महावितरणचे कळंब उपकेंद्र कर्जत तालुक्यातील वारे ग्रामपंचायत हद्दीत आहे. त्या उपकेंद्राची निर्मिती होत असताना वारे ग्रामपंचायतीने महावितरण आणि महाइन्फ्रा कंपनीकडे सार्वजनिक वीज वितरण करण्यासाठी विजेच्या खांबावर लावलेल्या दिव्यांसाठी स्वतंत्र वीजवाहिनी टाकून देण्याची मागणी केली होती. मात्र महावितरणकडून वारे ग्रामपंचायत हद्दीतील कोणत्याही गावात तशी व्यवस्था करण्यात आलेली नाही. त्यामुळे ग्रामपंचायत प्रशासनाकडून लावण्यात आलेल्या एलईडी दिव्यांचा प्रकाश फक्त रात्रीच नाहीतर दिवसभर पडलेला असतो. विजेच्या खांबावर सर्व्हिस लाईन टाकली नसल्याने सर्व गावातील पथदिवे २४ तास कार्यरत असतात. त्याबद्दल ग्रामपंचायतीकडून सातत्याने पाठपुरावा करूनदेखील महावितरणकडून कोणत्याही स्वरूपात सहकार्य केले जात नाही.

याबाबत स्थानिक ग्रामस्थ नितीन चवरे यांच्याकडून रायगड जिल्हा परिषदकडे ऑनलाईन स्वरूपात तक्रार करण्यात आली होती. त्यामुळे रायगड जिल्हा परिषदेकडून वारे ग्रामपंचायतीकडे त्याबाबत विचारणा करण्यात आली होती. त्यावेळी सरपंच योगेश राणे यांनी महावितरणचे कर्जत येथील सहाय्यक अभियंता प्रकाश देवके यांची भेट घेवून सर्व्हिस लाईनबाबत विचारणा केली आणि लवकरात लवकर सार्वजनिक वितरण व्यवस्थेसाठी नवीन सर्व्हिस लाईन टाकण्यात यावी, असे सूचित केले आहे.



**व्यवस्थापक पाहिजे**
**जाहीर नोटीस**

या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, आमच्या गुरुशरणम कॉम्प्लेक्स को. ऑप. हौसिंग सोसायटी पनवेल येथे कुशल व अनुभवी उमेदवाराची व्यवस्थापकपदी नेमणूक करावयाची आहे. तरी वाणिज्य शाखेची पदवी व्यवस्थापक पदाचा अनुभव व वयोमर्यादा ३० ते ५० वर्षे या दरम्यान असणाऱ्या उमेदवारांनी अर्ज करावा. सोबत शैक्षणिक कागदपत्रे व अनुभवाचा दाखला घेऊन खालील ठिकाणी प्रत्यक्ष भेटावे.

**कार्यालय स्थळ संपर्क :–** गुरुशरणम कॉम्प्लेक्स को. ऑप. हौसिंग सोसायटी, विश्राळी नाका, मार्केट यार्ड रोड, जुने पनवेल, जि. रायगड. ४१०२०६.

**संपर्क मोबाईल :–** ९९२०४४९५९५ – चेअरमन – जितेंद्र महाजन
९५९४०८८८८९ – सेक्रेटरी – दर्पण कोचर
९८६७२९५९९९ – पाटील जी. बी.

**सही/–**
**सचिव**
**गुरुशरणम कॉम्प्लेक्स को. ऑप. हौसिंग सोसायटी लि. पनवेल.**

# पेण नगर परिषदेची भोगावती नदी स्वच्छता मोहीम






**पेण : प्रतिनिधी**

माझी वसुंधरा अभियाना अंतर्गत पेण नगर परिषदेच्या वतीने प्रशासक जीवन पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली भोगावती नदी स्वच्छता मोहीम राबिवण्यात आली.

पेण नगर परिषदेने २५ कंत्राटी सफाई कामगारांच्या मदतीने दोन ट्रॅक्टर व कचरा ट्रॉली घेवून भोगावती नदीतून १५ ते २० टन जलपर्णी काढली. पेण नगर परिषदेमार्फत अशाच प्रकारे स्वच्छता अभियान सातत्याने राबविण्यात येत आहे. दोन महिन्यापूर्वीही नदीतून जलपर्णी काढण्यात आली होती. मात्र जलपर्णीमध्ये झपाट्याने वाढ होत असून पाणी वाहून जाण्यास अडथळा निर्माण होत होता. त्यामुळे आता २५ कंत्राटी सफाई कामगार यांच्या मदतीने नदीतून १५ ते २० टन जलपर्णी काढण्यात आली. दोन ट्रॅक्टरच्या मदतीने सदर जलपर्णी घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प येथे वाहून नेण्यात आला.

पेण नगर परिषदेचे प्रशासक जीवन पाटील, लेखापाल किरण शहा, आरोग्य अभियंता अंकिता इसळ, आरोग्य निरीक्षक शिवाजी चव्हाण, महेश वडके यांच्यासह नगर परिषदेचे कर्मचारी व सर्व मुकादमही या मोहिमेत सहभागी झाले होते.

**कागदपत्रे हरविलेबाबत**

श्री. रोहन राजेश टिकम, पत्ता : रूम नं २०३ नवसंकल्प प्लॉट नं २१ लखानी हेरिटेज जवळ, सेक्टर ५, न्यू पनवेल यांचेकडून प्रवास करीत असताना खालील कागदपत्र दिनांक १५/०९/२०२२ रोजी संध्याकाळी ०५.३० वाजता कोठेतरी पडून हरवले आहे. त्याबाबत पनवेल शहर पोलिस स्टेशनला दिनांक २१/९/२०२२ रोजी नोंद (रजिस्ट्रेशन नंबर १५२६/२०२२) केली आहे.

**: हरविलेले कागदत्र :**

NCC **चे मुळ ओळखपत्र दि. १५/०९/२०२२ रोजी संध्याकाळी ०५.३० वाजता खांदा कॉलनी परिसरात पडून गहाळ झाले आहे.**

सदर कागदपत्र जर कुणाला सापडले असल्यास अथवा रोहन राजेश टिकम यांचेकडे आणून द्यावे अथवा मोबाईल : ९९८७५५३०६१ या नंबरवर संपर्क साधावा.

**सही/–**
**श्री. रोहन राजेश टिकम**

**कुळगांव बदलापूर नगरपरिषद**

नगरपरिषद दुबे रुग्णालय इमारत, पहिला मजला, आदर्श विद्यामंदिर रोड, बदलापूर रेल्वे स्टेशन (पूर्व), कुळगांव, पिन–४२१५०३. ता. अंबरनाथ जि. ठाणे.
ईमेल :– coud.kulgaonbadalapur@maharashtra.gov.in
वेबसाईट :– https://kbmc.gov.in

जा.क्र. : कुबनप/साबां/७१९/२०२२–२३ दिनांक :– २३/११/२०२२

**जाहीर निविदा सूचना क्र. ८८/२०२२–२३**

कुळगांव बदलापूर नगरपरिषदेच्या बांधकाम विभागामार्फत विविध ०५ कामांसाठी महाराष्ट्र शासनाकडील योग्य त्या नोंदणीकृत कंत्राटदाराकडन टक्केवारी दराच्या निविदा मागविण्यात येत आहे.

सदर निविदा संच विक्री व स्विकृतीचा कालावधी दि. २४/११/२०२२ ते दि ०२/१२/२०२२ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत आहे व सदर निविदा शक्य झाल्यास दि. ०५/१२/२०२२ रोजी दुपारी ४.०० नंतर उघडण्यात येतील.

निविदेबाबतच्या सविस्तर तपशील नगरपरिषदेच्या सूचना फलकावर उपलब्ध करण्यात आलेला आहे.

**सही/–**
**(योगेश गोडसे)**
मुख्याधिकारी तथा
प्रशासक कुळगांव बदलापूर नगरपरिषद

# निष्काळजीपणे व हयगयीने गाडी चालवून अपघात केल्यामुळे आरोपीस शिक्षा

**खालापूर : प्रतिनिधी**

निष्काळजीपणे व हयगयीने गाडी चालवून अपघात केल्याबद्दल आरोपी लालसिंग पुरनमांसी पटेल याला खालापूर प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी पी. एम. माने यांनी न्यायालय न्यायासनावरून उठेपर्यंत साधा कारावास व दहा हजार रुपये दंड अशी शिक्षा सूनावली.

आरोपी लालसिंग पटेल याने त्याच्या ताब्यातील टेम्पो मुंबई–पुणे द्रुतगती मार्गावर अतिवेगात, हयगयीने, बेदरकारपणे, रस्त्याचे परिस्थितीकडे दुर्लक्ष करून चालवून ८ फेब्रुवारी २०१७ रोजी सायंकाळी ५ वाजण्याच्या सुमारास सावरोली गावाच्या हद्दीत हुडाई कारला जोरदार धडक दिली. या अपघातात कार चालक व इतर तीन जणांस दुखापती करून कारचे नुकसान केले. या बाबत खालापूर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली होती.

या अपघाताचा तपास तपासीक अमलदार एस. इ. गायकवाड व पोलीस हवालदार एस. एल. पाटील यांनी करून खालापूर प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांच्या न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले होते. या खटल्यात सरकार पक्षतर्फे एकूण सहा साक्षीदारांच्या साक्ष, जबान्या नोंदवून युक्तीवाद सादर केला होता. न्यायालयाने आरोपी लालसिंग पटेल याला दोषी धरून भादवि कलम २७९, ३३७ मो. १८४ अन्वये न्यायालय न्यायासनावरून उठेपर्यंत साधा कारावास व दहा हजार रुपये दंड अशी शिक्षा सूनावली. या खटल्यात अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील के. आर. कांबळे व कल्पना अरविंद फोंडके यांनी काम पाहिले. त्यांना न्यायालयातील पोलीस हवालदार ए. एन. तडवी व पैरवी अधिकारी मुरली गायकर यांनी सहकार्य केले.

**कागदपत्रे हरविलेबाबत**

श्री. अनिकेत राजेश टिकम, पत्ता : रूम नं २०३ नवसंकल्प प्लॉट नं २१ लखानी हेरिटेज जवळ, सेक्टर ५ न्यू पनवेल यांचेकडून प्रवास करीत असताना खालील कागदपत्र दिनांक १५/०९/२०२२ रोजी संध्याकाळी ०५.३० वाजता कोठेतरी पडून हरवले आहे. त्याबाबत पनवेल शहर पोलिस स्टेशनला दिनांक २१/९/२०२२ रोजी नोंद (रजिस्ट्रेशन नंबर १५२५/२०२२) केली आहे.

**: हरविलेले कागदत्र :**

NCC **चे मुळ ओळखपत्र दि. १५/०९/२०२२ रोजी संध्याकाळी ०५.३० वाजता खांदा कॉलनी परिसरात पडून गहाळ झाले आहे.**

सदर कागदपत्र जर कुणाला सापडले असल्यास अथवा अनिकेत राजेश टिकम यांचेकडे आणून द्यावे अथवा मोबाईल : ९९८७५५३०६१ या नंबरवर संपर्क साधावा.

**सही/–**
**श्री. अनिकेत राजेश टिकम**

**परिशिष्ट क्र. १६**
(उपविधी क्र. ३५ अन्वये)
मयत सदस्याचे संस्थेच्या भांडवलात/मालमत्तेत असलेले हितसंबंध व भाग हस्तांतरित करण्याबाबत हक्क मागण्या किंवा हरकती मागविण्यासाठी द्यावयाच्या नोटीशीचा नमुना
**नोटीस**

वृंदावन (जी+३) सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, प्लॉट ५२, सेक्टर – ०९, खांदा कॉलनी, नवीन पनवेल (पश्चिम), पनवेल – ४१०२०६ या संस्थेचे सदस्य असलेल्या, या संस्थेच्या इमारतीत दुकानगाळा क्र. ६१ धारण करणाऱ्या श्री. दत्ताराम विठ्ठल कांबळे यांचे तारीख २५/०१/२०२० रोजी निधन झाले. त्यांनी नामनिर्देशन केलेले नाही. संस्थेद्वारे, या नोटीशीद्वारे संस्थेच्या भांडवलात/मालमत्तेत असलेले मयत सदस्याचे भाग व हितसंबंध हस्तांतरित करण्यासंबंधी मयत सदस्याचे वारसदार किंवा अन्य मागणीदार / हरकतदार यांच्याकडून हक्क मागण्या / हरकती मागविण्यात येत आहेत. ही नोटीस प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासून १५ दिवसांत त्यांनी आपल्या मागण्यांच्या वा हरकतींच्या पुष्ठयर्थ आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रती व अन्य पुरावे सादर करावेत. जर वर नमूद केलेल्या मुदतीत, कोणाही व्यक्तीकडून हक्क मागण्या किंवा हरकती सादर झाल्या नाहीत तर, मयत सदस्याचे संस्थेच्या भांडवलातील/मालमत्तेतील भाग व हितसंबंध यांच्या हस्तांतरणाबाबत संस्थेच्या उपविधीनुसार कार्यवाही करण्याची संस्थेला मोकळीक राहील. जर अशा कोणत्याही हक्क मागण्या/हरकती आल्या तर, त्याबाबत संस्थेच्या उपविधीनुसार कार्यवाही करण्यात येईल. नोंदी व उपविधींची एक प्रत मागणीदारांस/हरकतदारांस पाहण्यासाठी संस्थेच्या कार्यालयात सचिव यांचेकडे सोमवार ते शनिवार संध्याकाळी ०७.०० वा. ते रात्रौ ०९.०० वा. पर्यंत आणि रविवारी सकाळी ११.०० वा. ते दुपारी ०१.०० वा. पर्यंत, नोटीस दिल्याच्या तारखेपासून नोटीशीची मुदत संपण्याच्या तारखेपर्यंत उपलब्ध राहील.

ठिकाण : खांदा कॉलनी, नवीन पनवेल (प.)
दिनांक : २४ .११.२०२२

**वृंदावन (जी+३) सहकारी संस्था मर्यादित यांच्या करीता आणि वतीने**
**(सुजित सुधीर येवलेकर)**
**सचिव**


# नवी मुंबईत ईज ऑफ लिव्हिंग इंडेक्स सर्वेक्षण

## सहभागासाठी पालिका आयुक्तांचे आवाहन

**नवी मुंबई : बातमीदार**

महापालिकेस स्वच्छतेसह वैशिष्टयपूर्ण प्रकल्प, कामांमुळे तसेच दर्जेदार सेवासुविधांमुळे राज्य व राष्ट्रीय पातळीवर विविध बहुमान, पुरस्कार प्राप्त झाले असून यामध्ये नवी मुंबईकर नागरिकांच्या प्रत्येक उपक्रमातील सक्रिय सहभागाचा महत्वाचा वाटा राहिला आहे. देशातील एक लक्षणीय शहर म्हणून नवी मुंबईचा सर्वत्र नावलौकिक होत असताना येथील नागरी सुविधांच्या उत्तम दर्जामुळे नवी मुंबईकर रहिवाशी होण्याची इच्छा अनेकजण सोशल मिडियाच्या विविध प्लॅटफॉर्मवरून व्यक्त करताना दिसतात.

केंद्र सरकारच्या गृहनिर्माण व शहरी विकास मंत्रालयाच्या वतीने देशातील निवासयोग्य शहरांची स्पर्धा 'ईज ऑफ लिव्हिंग इंडेक्स' आयोजित करण्यात आली असून यामध्ये नवी मुंबई शहर उत्साहाने व पूर्ण क्षमतेने सहभागी झाले आहे. या स्पर्धेतर्गत नागरिक अभिप्राय सर्वेक्षण (Citizen Perception Surve) करण्यात येत असून शहरातील स्वच्छता, आरोग्य, शिक्षण, वाहतुक व्यवस्था अशा विविध बाबींविषयी नागरिकांचे अभिप्राय घेण्यात येत आहेत. हे



अभिप्राय घेण्याकरिता http://bit.ly/3ObpOa9 ही लिंक केंद्र सरकारमार्फत उपलब्ध करून देण्यात आली असून त्यामधील १७ प्रश्नांवर योग्य पर्याय निवडून नागरिकांनी विविध विषयांवर अभिप्राय नोंदवायचे आहेत.

या सर्वेक्षणाची माहिती नागरिकांपर्यंत व्यापक स्वरूपात पोहचण्यासाठी महानगरपालिकेच्या सर्व अधिकारी, कर्मचारी यांनी आपापल्या स्तरावर प्रयत्न करावेत असे निर्देश महापालिका आयुक्त श्री. राजेश नार्वेकर यांनी यापूर्वीच अधिकाऱ्यांच्या विशेष बैठकीत दिले होते.

यामध्ये सर्व अधिकारी, कर्मचारी यांनी स्वत: तसेच आपले कुटुंबिय यांचे अभिप्राय प्राधान्याने नोंदवावेत त्याचप्रमाणे क्षेत्रीय स्तरावर सोसायट्या, शाळा-महाविद्यालये, सरकारी तसेच खाजगी आस्थापना, उद्योग, व्यवसाय ठिकाणे येथे भेटी देऊन जास्तीत जास्त नागरिकांनी आपल्या नवी मुंबई शहरविषयी मनात असलेली प्रेमाची व अभिमानाची भावना या अभिप्रायाच्या स्वरूपात दाखल करण्याविषयी नागरिकांपर्यंत पोहचण्याचे सूचित केले होते. याबाबत झालेल्या कार्यवाहीचा विभागनिहाय सविस्तर आढावा आयुक्तांनी अधिकाऱ्यांच्या बैठकीत घेतला आणि याबाबतची कार्यवाही अधिक व्यापक स्वरूपात व गतीमानतेने करण्याचे विभागप्रमुखांमार्फत सर्व अधिकारी, कर्मचारीवृंदाला निर्देश दिले.

### अभिप्राय व्यक्त करण्याची एक संधी

केंद्र सरकारमार्फत जाहीर करण्यात आलेल्या ईज ऑफ लिव्हिंग इंडेक्समध्ये नवी मुंबई शहराविषयी व तेथील सुविधांविषयी अभिप्राय व्यक्त करण्याची एक नामी संधी नागरिकांना उपलब्ध झालेली आहे. प्रत्येक नवी मुंबईकर नागरिकाने आपल्या मोबाईलमध्ये http://bit.ly/3ObpOa9 या लिंकवर क्लिक करून नागरिक अभिप्राय सर्वेक्षणामध्ये भाषा निवडून रेफरल कोड ८०२७८८ टाकावा व त्यानंतर स्वत:चे नाव, आडनाव, नोकरी/व्यवसाय, स्त्री/पुरूष, वय, शिक्षण, राज्य, शहर टाकून १७ प्रश्नांची सर्वोत्तम उत्तरे नोंदवावीत आणि आपल्या नवी मुंबई शहराविषयी मनात असलेले प्रेम व सार्थ अभिमान व्यक्त करीत नवी मुंबईला देशातील नंबर वन निवासयोग्य शहर बनविण्यासाठी आपले अमूल्य योगदान द्यावे, असे आवाहन आयुक्त राजेश नार्वेकर यांच्या वतीने करण्यात येत आहे.

## दत्त जयंतीच्या पूर्वतयारीसाठी कातळपाडा ग्रामस्थांची बैठक

**उरण : वार्ताहर, बातमीदार**

उरण तालुक्यातील चिरनेर कातळपाडा येथील हजारो दत्त भक्तांचे श्रद्धास्थान असलेल्या, दत्त मंदिरात यंदाही मोठ्या भक्ती भावाने दत्त जयंतीचा सोहळा साजरा करण्यात येणार असून, दत्त जयंती उत्सवाच्या पूर्वतयारीचे नियोजन व व्यवस्थापन व्यवस्थितरित्या व्हावे, यासाठी कातळपाडा ग्रामस्थांची नुकतीच महत्त्वपूर्ण बैठक घेण्यात आली होती.

बैठकीत नियोजन व व्यवस्थापन तसेच त्यासाठी करावी लागणारी पूर्वतयारी या संदर्भात ग्रामस्थांमध्ये साधक बाधक चर्चा करण्यात आली. यात ६ ते ८ डिसेंबर या कालावधीत दत्त जयंती सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असून, दत्तगुरूंची ग्राम भिक्षा फेरी आणि मुख्यदिवशी दत्तगुरूंचा जन्मोत्सव सोहळा पालखी मिरवणूक तसेच श्री सत्यनारायणाची महापूजा व अन्य धार्मिक कार्यक्रमांचे आयोजनदेखील करण्यात आले आहे.

दरम्यान, येथील जुन्या दत्त मंदिराच्या छताला गळती लागल्यामुळे जुने दत्त मंदिर पाडून त्याजागी गेल्यावर्षी म्हणजे २०२१ साली लोकवर्गणीतून भव्य व देखण्या अशा दत्तगुरूंच्या मंदिराची उभारणी ग्रामस्थांनी केली आहे. गतवर्षी मोठ्या थाटात दत्तगुरूंचा उत्सव साजरा झाला. यावर्षीही भव्य दिव्य असा मोठ्या प्रमाणावर दत्त जयंतीचा सोहळा साजरा करण्यात येणार आहे. त्यामुळे पूर्व तयारीच्या दृष्टीने कातळपाडा ग्रामस्थ तयारीलाही लागले आहेत.



## सीकेटी विद्यालयात संविधान दिनानिमित्त जागर फेरी

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेलमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) मराठी प्राथमिक विद्यालयात संविधान दिनानिमित्त बुधवारी (दि. २३) जागर फेरी काढण्यात आली. यामध्ये कब-बुलबुल व तिसरी चौथीच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. जागर फेरी नवीन पनवेल परिसरात फिरवण्यात आली.

भारतीय संविधान हे भारतीय नागरिकांना मिळालेली देणगी आहे. भारतीय संविधान जगातील सर्वात मोठे लिखित स्वरूपाचे संविधान आहे. त्याचे महत्त्व विद्यार्थ्यांना व नागरिकांना कळावे हे या जागर फेरीचे उद्दिष्ट आहे. मुख्याध्यापक श्री. मानकर यांच्या हस्ते जागर फेरीचे उद्घाटन करण्यात आले. या वेळी सर्व शिक्षकवृंद उपस्थित होते.



## करंजा मच्छीमार संस्थेची १८ डिसेंबरला निवडणूक

**उरण : वार्ताहर**

तालुक्यातील चाणजे ग्रामपंचायत हद्दीतील चाणजे येथील करंजा मच्छीमार विविध कार्यकारी सहकारी संस्थेची पंचवार्षिक निवडणूक १८ डिसेंबर रोजी होणार असल्याची माहिती राज्य मत्स्यव्यवसाय विभागाचे निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपनिबंधक सहकारी संस्थेचे शिरिष सकपाळ यांनी दिली.

करंजा मच्छीमार विविध कार्यकारी सहकारी संस्था राज्यातील सर्वात मोठी संस्था आहे. वार्षिक सुमारे ५० ते ५१ कोटींची उलाढाल असलेल्या संस्थेचे एकूण ३८१२ मतदार आहेत. ३८१२ मतदार १७ संचालकांची गुप्त मतदानाने निवड करणार आहेत. यामध्ये दोन महिला संचालकांचा समावेश आहे. २०१५ रोजी संस्थेची पंचवार्षिक निवडणूक झाली होती.


२०२०-२१ मध्ये संस्थेची मुदत संपुष्टात आली होती, मात्र कोरोनामुळे दोन वर्ष निवडणूक लांबणीवर पडली होती. आता मात्र मुदत वाढीनंतर येत्या १८ डिसेंबर रोजी मतदान होणार आहे. मतदानानंतर तत्काळ त्याच ठिकाणी मतमोजणी केली जाणार असल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी शिरिष सकपाळ यांनी दिली.



## पनवेल परिसरात घरफोडीसह मोबाइल चोरणारे गुन्हेगार ताब्यात

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल परिसरात घरफोडीसह मोबाईल चोरी करणाऱ्या दोन सराईत गुन्हेगारास पनवेल शहर पोलिसांनी तांत्रिक तपासाच्या आधारे ताब्यात घेतले आहे.




पनवेल शहर परिसरात गेल्या काही दिवसांपासून मोबाईल चोरीसह घरफोडीच्या घटनांमध्ये वाढ झाली होती. यासंदर्भात आरोपींना जेरबंद करण्यासाठी वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय कादबाने यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक शिंदे व पोलीस निरीक्षक जोशी यांनी या चोरांना पकडण्यासाठी गुन्हे शाखेचे दोन पथके तयार केले. त्यामध्ये सहाय्यक पोलीस निरीक्षक दळवी, उपनिरीक्षक अभयसिंह शिंदे, हवालदार वाघमारे, रवींद्र राऊत, नाईक राठोड, पाटील, परेश म्हात्रे, महेंद्र वायकर, विनोद देशमुख, रविंद्र पारधी, शिपाई दुधे, मिसाळ, विवेक पारासुर, प्रसाद घरत आदींनी या चोरट्यांचा शोध घेत होते.

या वेळी त्यांना गुप्त बातमीदारांच्या माहितीच्या आधारे व तांत्रिक तपासाद्वारे आरोपी सुमित भरत उदरेजा, (वय १९ वर्षे, रा. ठी. शिवाजी नगर झोपडपट्टी, पनवेल) तसेच फरीद अक्रम कोकरे (वय २८ वर्षे, रा. खालचा मोहलला, रोहा, रायगड) यांना ताब्यात घेऊन त्यांच्याकडून गुन्ह्यांतील मोबाइल व इतर ऐवज हस्तगत करण्यात आला आहे.

## कृषी उत्पन्न बाजार समितीत सफरचंदाचे वर्चस्व

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीच्या फळ बाजारावर सफरचंदाचे वर्चस्व निर्माण झाले आहे. प्रतिदिन ७०० ते एक हजार टनाची आवक होत आहे. संत्री आणि मोसंबीची आवकही वाढली असून ग्राहकांकडून सीताफळालाही पसंती मिळू लागली आहे.

बाजार समितीमध्ये फळांची आवक व फळ मार्केटमध्ये प्रतिदिन १,५०० ते १,८०० टन फळांची आवक होऊ लागली आहे. सफरचंद, संत्री, मोसंबी, पपई, कलिंगड यांची नियमित १०० टनापेक्षा जास्त आवक होत आहे. हिमाचल प्रदेशमधील सफरचंदांचा हंगाम सुरू आहे. होलसेल मार्केटमध्ये सफरचंदाला ६० ते ९० रुपये दर मिळत आहे. किरकोळ मार्केटमध्ये १०० ते २०० रुपये किलो दराने सफरचंद विकले जात आहे. घाऊक बाजारात इराणी सफरचंदामुळे काश्मीर आणि किन्नर सफरचंदाच्या दरात घसरण होण्यास सुरुवात झाली आहे.

इराण, टर्की आणि न्यूझीलंडमधून सफरचंदाची आवक मोठ्या प्रमाणात होत आहे. इराणी सफरचंद ८० ते १०० रुपये; तर काश्मीर सफरचंद ६० ते ९० रुपये प्रतिकिलो घाऊक बाजारात विक्री होत आहे.

महाबळेश्वर व नाशिकमधून स्ट्रॉबेरीची आवक वाढू लागली आहे. एपीएमसी मार्केटमध्ये डाळिंबही भाव खात आहेत. नाशिकमधून द्राक्षाची आवक वाढण्यास सुरुवात झाली आहे. नाशिकमधील काळी द्राक्ष देखील बाजारात उपलब्ध होत आहेत.



### फळ बाजारातील आयात

| फळ | आवक (टन) | दर रु. (किलो) |
|---|---|---|
| डाळिंब | ६६ १ | २० ते १८० |
| द्राक्ष | १४ | ७० ते ८० |
| कलिंगड | ११५ | १६ ते ३० |
| मोसंबी | १२९ | २५ ते ५० |
| सफरचंद | ७३९ | ६० ते ९० |
| संत्री | १९८ | २६ ते ५० |
| सीताफळ | ९८ | ४० ते ८० |
| स्ट्रॉबेरी | ६ | १२० ते २०० |

## नवी मुंबईत आगरी-कोळी कोकण संस्कृती महोत्सव उत्साहात

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबई बाळासाहेबांची शिवसेना प्रभाग ३९ पुरस्कृत शिवतेज मित्र मंडळ तर्फे बेलापूर येथील सी. एन. जी. पेट्रोल पंप शेजारील मैदानावर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, शिवसेना नेते विजय नाहट, शिवसेना नेते विजय चौगुले यांच्या मार्गदर्शनाखाली आगरी कोळी कोकण संस्कृती महोत्सवाचे ४ ते २० नोव्हेंबर २०२२ या कालावधीत सायंकाळी ५ ते रात्री १० या वेळेत उप शहर प्रमुख विशाल कोळी, महिला उप शहर संघटक तेजस्वी विशाल कोळी, उपशहर प्रमुख राम कोळी यांच्या वतीने आयोजन करण्यात आले होते. २० नोव्हेंबर रोजी या महोत्सवाची सांगता सांस्कृतिक कार्यक्रमाने व पारितोषिक वितरण कार्यक्रमाने झाली.

महोत्सवात संस्थापक शिवतेज मित्र मंडळ बेलापूर विशाल कोळी यांच्या वाढदिवसानिमित्त साई भंडाराचे आयोजन करण्यात आले होते. या महोत्सवदरम्यान शिवसेना नेते विजय चौगुले, उपनेते विजय नाहटा, रोहिदास पाटील, सरोज पाटील, निळकंठ म्हात्र आदींसह मान्यवरांची उपस्थिती लाभली होती.

सदर महोत्सव यशश्वी करण्यासाठी शिवतेज मित्र मंडळ संस्थापक विशाल कोळी, अध्यक्ष भूषण मोरे, सेक्रेटरी रामा कोळी, उप सेक्रेटरी पांडुरंग बिरादार, खजिनदार प्रकाश आमटे, सचिव नागेश पाटील, उप खजिनदार धवल जैन, सह सचिव मंगेश रामा कोळी, वेदांत विशाल कोळी, गणेश म्हात्रे आदींसह उप शहर संघटक तेजस्वी विशाल कोळी, सुनंदा रामा कोळी, विभाग संघटक सविता पाटील, शाखा संघटक वैशाली प्रकाश आमटे, बबन बाबर, इंगळे मॅडम, राजेश्री भोरे, अर्चना बिरादार, मनीषा बाबर, अविना म्हात्रे, वेदांती कोळी, प्राची कोळी, नियती पाटील, ॲड. मानसी कोळी आदींसह युवा कार्यकर्त्यांनी मेहनत घेतली.



## खारघरमध्ये शनिवारी रक्तदान शिबिर

**खारघर : रामप्रहर वृत्त**

खान्देश विकास फाउंडेशन यांच्या वतीने २६/११ मुंबईवरील दहशतवादी हल्ल्यातील शहीद खान्देशचे सुपुत्र योगेश पाटील (मुंबई पोलीस) यांच्या स्मृतिप्रित्यर्थ शहिदांना आदरांजली म्हणून टाटा कॅन्सर हॉस्पिटल खारघरमधील रुग्णांसाठी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.



खारघर सेक्टर १९ मधील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलमध्ये शनिवारी (दि. २६) सकाळी ९ ते दुपारी २वाजेपर्यंत हे रक्तदान शिबिर होणार आहे. अधिक माहितीसाठी ९९६७६६१८६२, ९८३३७७१३८४, ८१०८८९१९९९, ९४२०६४५३८१ या क्रमांकांवर संपर्क साधावा, तसेच जास्तीत जास्त रक्तदात्यांनी या शिबिरात रक्तदान करावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

## उरणमधील केगाव-देवळी येथे साई भंडारा

**उरण : वार्ताहर**

केगाव-देवळी येथील श्री साई मंदिरात श्री द्वारकामाई मंडळ यांच्या वतीने केगाव ते शिर्डी साई पालखी पदयात्रा सोहळा झाला. शनिवारी (दि. १९) साई भंडाराचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यकारी मंडळाचे अध्यक्ष राजा म्हात्रे, मनोज कदम, भूपेंद्र ठाकूर, निलेश पाटील, गणेश माळी, सचिन पागावाड, जयप्रकाश माळी, जयप्रकाश माळी, अजय म्हात्रे, सुमित पाटील, गोविंद पाटील, जयेश पाटील आदींनी पदयात्रा व भंडाऱ्यासाठी परिश्रम घेतले.



या वेळी केगाव सरपंच आशिष तांबोळी, माजी सरपंच जगजीवन नाईक, जितेंद्र घरत, भावना पाटील, राजेंद्र ठाकूर, केगाव ग्रामपंचायत सदस्य अविनाश पाटील, योगिता ठाकूर, ज्योती पाटील, रजनी पाटील, शंकर तांडेल, नितीन पाटील, भूपेंद्र घरत, पराग काठे, डॉ. भालचंद्र नाखवा, जगदीश पाटील, दिनेश घरत, सागर म्हात्रे, हरिओम राजेश पाटील, विक्रांत भिंगार्डे, अजित म्हात्रे आदींचे स्वागत करण्यात आले.



वाचाल तर वाचाल!

जाणून घ्या साहित्यिकांच्या आवडत्या पुस्तकांविषयी...

**जाणून घ्या साहित्यिकांच्या आवडत्या पुस्तकांविषयी...**

वाचाल तर वाचाल हे नवे सदर दर महिन्याच्या पहिल्या आणि चौथ्या रविवारी 'दैनिक राम प्रहर'च्या अंकात वाचा. या सदरात वाचा निवडक साहित्यिकांनी वाचलेल्या पुस्तकांविषयीचे रसग्रहण.

येत्या रविवारी, २७ नोव्हेंबर २०२२ रोजी वाचूया रोहा येथील दुर्गअभ्यासक, लेखक, रायगडभूषण सुखद राणे यांच्या आवडत्या पुस्तकांविषयी त्यांच्याच लेखातून.

# दिघी बंदरातील ड्रेजिंगमुळे मच्छीमार त्रस्त

## कोळंबीचे उत्पादन घटले, व्यावसायिकांचे नुकसान



**मुरूड : प्रतिनिधी**

जेएनपीटीच्या धर्तीवर दिघी बंदराचा विकास करण्यात येत आहे. या बंदराची खोली वाढविण्यात येत असून, त्यासाठी एका मोठ्या ड्रेजिंग जहाजाद्वारे खाडीतील चिखल, गाळ व दगड बाहेर काढण्याचे काम सुरु आहे. हा गाळ दुसऱ्या ठिकाणी टाकल्याने समुद्रात चिखलाचे थर निर्माण होऊन स्थानिक मच्छीमारांच्या होड्या रुतण्याची शक्यता निर्माण झाली आहे. मुख्य म्हणजे कोळंबीचे उत्पादन घटल्यामुळे मच्छीमारांचे मोठे नुकसान होत आहे.

सुमारे ३५०० कोटी रुपये खर्च करून मुरूड तालुक्यातील दिघी बंदरांचा विकास करण्यात येत आहे. परदेशातून मोठमोठ्या जहाजातून येणारा माल दिघी बंदरातून कंटेनरद्वारे देशाच्या विविध ठिकाणी पोहचवला जाणार आहे. मोठमोठी मालवाहू जहाजे यावीत यासाठी दिघी बंदराची खोली वाढविण्याचे काम सध्या सुरू आहे. त्यासाठी पद्मदुर्ग किल्ल्यासमोर एक मोठे ड्रेजिंग करणारे जहाज आणण्यात आले आहे.

या जहाजाद्वारे मोठ्या प्रमाणात ड्रेजिंग करून चिखल, गाळ व दगड बाहेर काढण्यात येत आहेत. मात्र हे ड्रेजिंगचे काम चुकीच्या पद्धतीने सुरु असल्याचा आक्षेप एकदरा येथील हनुमान मच्छीमार सोसायटी व मच्छीमार घेत आहेत. वास्तविक ड्रेजिंगद्वारे निघालेला चिखल अथवा गाळ किनाऱ्यावर नेऊन टाकला पाहिजे. मात्र पद्मदुर्ग किल्ला परिसरातून ड्रेजिंगद्वारे काढलेला गाळ समुद्रातच दुसऱ्या ठिकाणी टाकला जात असल्याने त्या ठिकाणी समुद्रात चिखलाचे थर निर्माण होऊन स्थानिक मच्छीमारांच्या होड्या रुतण्याची शक्यता निर्माण झाली आहे. तसेच कोळंबीचे उत्पादन घटले आहे. प्रशासनाने या बाबीकडे गंभीरपणे लक्ष देऊन बंदर विकासकाकडून स्थानिक मच्छीमारांना भरपाई मिळवून द्यावी, अशी मागणी सर्व मच्छीमारांकडून करण्यात येत आहे. सध्या समुद्रात कोळंबी मोठ्या प्रमाणात मिळत आहे. मात्र पद्मदुर्ग किल्ला परिसरात होत असलेल्या ड्रेजिंगमुळे कोळंबी खोल समुद्रात निघून गेल्याने स्थानिक मच्छीमारांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले असून याची भरपाई कंपनी व्यवस्थापनाने करून द्यावी, अशी मागणी होत आहे.

**ड्रेजिंगद्वारे काढण्यात येणारा चिखल व गाळ खोल समुद्रात टाकणे आवश्यक होते. मात्र हा चिखल जवळच टाकल्याने समुद्रात उंचवटे निर्माण झाले आहेत. त्यामुळे मासेमारीसाठी जाणाऱ्या होड्यांना मार्ग काढताना त्रास होत आहे. या चिखलामुळे जाळी फाटतात तसेच या भागातील मासळी दूर निघून गेल्याने मच्छीमारांचे मोठे नुकसान झाले आहे.**

**–पांडुरंग आगरकर, चेअरमन,हनुमान मच्छीमार सोसायटी, एकदरा–मुरुड**

**चिखल असेल तिथेच कोळंबी मोठ्या प्रमाणात मिळते. पूर्वी एकदरा समुद्रात मोठ्या प्रमाणात कोळंबी मिळायची, मात्र आता ड्रेजिंगमुळे कोळंबीचे प्रमाण अत्यल्प झाल्याने स्थानिक मच्छीमारांचे मोठे आर्थिक नुकसान होत आहे,**

**–ललीत मढवी, नौकामालक,एकदरा, ता. मुरूड**

# रायगड जिल्ह्यातील धरणात समाधानकारक पाणीसाठा

**रोहे : प्रतिनिधी**

यावर्षी रायगड जिल्ह्यात चांगला पाऊस पडला आहे. त्यामुळे पाटबंधारे विभागाच्या जिल्ह्यातील प्रमुख धरणात नोव्हेंबर २०२२ पर्यंत चांगला पाणीसाठा उपलब्ध आहे. रायगड पाटबंधारे विभागाच्या जिल्ह्यातील २८ धरणांपैकी रोहा तालुक्यातील सुतारवाडी, म्हसळा तालुक्यातील पाभरे व खालापूर तालुक्यातील भिलवले या तीन धरणात अद्याप १०० टक्के पाणीसाठा उपलब्ध आहे. तर श्रीवर्धन तालुक्यातील रानीवली धरणात सर्वात कमी म्हणजे ५५ टक्के पाणीसाठा उपलब्ध आहे. रायगड जिल्ह्यात १६ धरणात ९० टक्केपेक्षा जास्त पाणीसाठा उपलब्ध आहे

रायगड पाटबंधारे विभाग–कोलाड यांच्याकडून मिळालेल्या माहितीनुसार रायगड जिल्ह्यात यंदा पावसाळ्यात एकूण ९००६६ मि.मी पाऊस पडला आहे.त्यामुळे जिल्ह्यातील २८ धरणांमध्ये मुबलक पाणीसाठा उपलब्ध आहे.



| तालुका | धरण | पाणीसाठा |
|---|---|---|
| मुरूड | फणसाड | ९९टक्के |
| तळा | वावा | ९७ टक्के |
| रोहा | सुतारवाडी | १०० टक्के |
| पेण | आंबेघर | ९३ टक्के |
| अलिबाग | श्रीगांव | ९१ टक्के |
| सुधागड | कोंडगाव | ९२ टक्के |
| सुधागड | घोटवडे | ९३ टक्के |
| सुधागड | ढोकशेत | ९१ टक्के |
| सुधागड | कवेळे | ८४ टक्के |
| सुधागड | उन्हेरे | ९१ टक्के |
| श्रीवर्धन | कार्ले | ७६ टक्के |
| श्रीवर्धन | कुडकी | ८९ टक्के |
| श्रीवर्धन | रानीवली | ५५ टक्के |
| म्हसळा | पाभरे | १०० टक्के |
| श्रीवर्धन | संदेरी | ९९ टक्के |
| महाड | वरंध | ९६ टक्के |
| महाड | खिंडवाडी | ९८ टक्के |
| महाड | कोथुर्डे | ९६ टक्के |
| महाड | खैरे | ८६ टक्के |
| कर्जत | साळोख | ८६ टक्के |
| कर्जत | अवसरे | ८८ टक्के |
| खालापूर | भिलवले | १०० टक्के |
| खालापूर | कलोते मोकाशी | ९५ टक्के |
| खालापूर | डोणवत | ८३ टक्के |
| पनवेल | मोरबे | ९७ टक्के |
| पनवेल | बामणोली | ९७ टक्के |
| पनवेल | उसरण | ९८ टक्के |
| उरण | पुनाडे | ७२ टक्के |

## अलिबागमध्ये जवाहर नवोदय विद्यालयाच्या नियोजन, सल्लागार समितीची बैठक उत्साहात



**अलिबाग : जिमाका**

जवाहर नवोदय विद्यालय–रायगड यांची विद्यालय नियोजन समिती आणि विद्यालय सल्लागार समिती यांची महत्त्वपूर्ण बैठक सोमवारी (दि.२१) जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालय येथे संपन्न झाली.

या बैठकीत विद्यालयाकरिता सांस्कृतिक सभागृह, सोलार लाईट योजना, विद्यालयातील आपात्कालीन स्थितीसाठी वाहन व्यवस्था, विद्यार्थ्यांच्या वैद्यकीय चाचण्या आणि वैद्यकीय शिबिर, विद्यालयाचे लँडस्केपिंग, विद्यालयाच्या मैदानांची दुरुस्ती इत्यादी महत्त्वपूर्ण विषयांवर चर्चा करण्यात आली. विद्यालयात २८ ते ३० नोव्हेंबर या कालावधीत वैद्यकीय शिबिर घेण्याची सूचना जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांनी या वेळी प्राचार्यांना केली.

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील व विद्यालयाचे प्राचार्य किरण इंगळे, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) ज्योत्स्ना शिंदे, उपप्राचार्य शिरीष जाधव, जिल्हा शल्यचिकित्सक प्रतिनिधी डॉ.रवींद्र रोकडे, नवोदय विद्यालयाचे कार्यालय अधीक्षक नितीन बुधगे, शैलेश पडवळ, गणेश अडोडे, तुकाराम सुतार, शिक्षक पालक संघटनेचे सदस्य नितीन बडे आदि या बैठकीला उपस्थित होते.

# चला जाणूया नदीला उपक्रमाच्या यशस्वीततेसाठी कटिबद्ध होवू या –अपर जिल्हाधिकारी अमोल यादव

**अलिबाग : जिमाका**

जल है तो, कल है या उक्तीतच पाण्याचे महत्त्व स्पष्ट होते. आपल्या व आपल्या पुढच्या पिढीच्या भवितव्यासाठी आपण सर्वांनी चला जाणूया नदीला या उपक्रमाच्या यशस्वीततेसाठी कटिबद्ध होवू या, त्यासाठी प्रत्येकाने आपापल्या परीने शक्य तितके योगदान द्यावे, असे आवाहन अपर जिल्हाधिकारी अमोल यादव यांनी मंगळवारी (दि. २२) येथे केले.



स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवांतर्गत चला जाणूया नदीला हा उपक्रम जलपुरुष डॉ. राजेंद्र सिंह यांच्या मार्गदर्शनाखाली देशभर राबविला जात आहे. या बाबतची कार्यशाळा जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांच्या मार्गदर्शनाखाली मंगळवारी जिल्हा नियोजन समिती सभागृहात आयोजित करण्यात आली होती, त्यावेळी अपर जिल्हाधिकारी यादव बोलत होते.

अपर जिल्हाधिकारी अमोल यादव पुढे म्हणाले की, सजीवांसाठी पाणी हा अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. दोन टक्के पाणी पिण्यायोग्य असून त्याचे संवर्धन करणे सर्व सजीवांसाठी आवश्यक आहे. त्यामुळे या अभियानात आपल्या सर्वांचा सक्रिय सहभाग अपेक्षित आहे.

शासन निर्णयाप्रमाणे जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय समन्वय समिती स्थापित करण्यात आली असून तालुका स्तरावरही अशा समन्वय समित्या स्थापन होणे आवश्यक असल्याचे यादव यांनी या वेळी सांगितले.

या कार्यशाळेचे प्रास्ताविक अलिबाग उपवनसंरक्षक आशिष ठाकरे यांनी केले. जलसंपदा विभागाच्या प्रभारी कार्यकारी अभियंता दिनेश्री राजभोज यांनी संगणकीय सादरीकरणाद्वारे जिल्ह्यातील भौगोलिक परिस्थिती, नद्या, धरणे व जलस्त्रोतांची माहिती दिली. म्हसळा तहसीलदार समीर घारे यांनी चला जाणूया नदीला या उपक्रमात प्रशासनाने दिलेल्या योगदानाबद्दल माहिती दिली. नदी संवाद यात्री किशोर धारिया, उदय मानकवळे, अरविंद म्हात्रे, रवींद्र पाटील यांनी जिल्ह्यातील भोगावती, सावित्री, काळ व कासाडी या नद्यांची सद्य:स्थिती, त्यांच्या समस्या तसेच त्यावरील उपाययोजनांबाबत मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जिल्हा माहिती अधिकारी मनोज शिवाजी सानप यांनी केले. उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) सर्जेराव मस्के–पाटील, जिल्हा नियोजन अधिकारी जयसिंग मेहत्रे, जिल्हा कृषी अधीक्षक उज्ज्वला बाणखेले, महाड प्रांताधिकारी प्रतिमा पुदलवाड, श्रीवर्धन प्रांताधिकारी अमित शेडगे, तहसीलदार विशाल दौंडकर, नदी संवाद यात्री चंद्रकांत उत्तेकर यांच्यासह जिल्ह्यातील सर्व तहसीलदार व विविध शासकीय विभागांचे अधिकारी व कर्मचारी या वेळी उपस्थित होते. सहाय्यक उपवनसंरक्षक संजय कदम यांनी आभार मानले.

# गोरेगाव येथे एनएसटीएस परीक्षा उत्साहात



**माणगाव : प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांचा अनुभव येण्यासाठी तसेच शास्त्रज्ञ होण्यासाठीचे प्रोत्साहन मिळावे, यासाठी जळगाव येथील नोबल फाउंडेशनच्या वतीने गोरेगाव (ता. माणगाव) येथील ना. म. जोशी विद्याभवन येथे रविवारी (दि. २०) एनएसटीएस परीक्षा घेण्यात आली.

विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांची माहिती व्हावी, शास्त्रज्ञ होण्यासाठीच्या परीक्षांबाबत माहिती हवी तसेच नीट, जेईई या सारख्या परीक्षांना सामोरे जाताना मनातील भीती दूर व्हावी यासाठी नोबल फाउंडेशनचे जयदीप पाटील हे दरवर्षी एनएसटीएस परीक्षा घेत असतात.

इच्छुक विद्यार्थ्यांची सुरुवातीला ऑनलाईन परीक्षा होते व त्यानंतर ऑफलाइन पद्धतीने परीक्षा होऊन पात्र विद्यार्थ्यांची मुलाखत घेतली जाते. पाचवी ते बारावीपर्यंतचे विद्यार्थी ही परीक्षा देत असतात.

गोरेगाव येथील ना. म. जोशी विद्याभवनमध्ये रविवारी घेण्यात आलेल्या एनएसटीएस परीक्षेच्यावेळी कोकण विभागातील प्रज्ञावंत विद्यार्थी उपस्थित होते. ही परीक्षा आयोजित केल्याबद्दल मुख्याध्यापक राजेंद्र पवार यांचे नोबेल फाउंडेशनच्या वतीने आभार मानण्यात आले.

## भारतीय मानकांच्या अंमलबजावणीकरिता अलिबागेत एकदिवशीय प्रशिक्षण शिबिर

**अलिबाग : जिमाका**

भारतीय मानक ब्युरो कायदा २०१६ अन्वये भारतीय मानकांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी राज्य शासनाच्या अधिकारी व कर्मचारी यांच्या क्षमतावर्धन तसेच केंद्र शासनामार्फत गुणवत्तेबाबत निर्गमित करण्यात येणाऱ्या आदेशाची अंमलबजावणी संदर्भात जिल्हाधिकारी कार्यालयात सोमवारी (दि. २१) जिल्हा पुरवठा अधिकारी मधुकर बोडके यांच्या अध्यक्षतेखाली जिल्ह्यातील सर्व शासकीय कार्यालयाच्या अधिकाऱ्यांचे एक दिवसाचे प्रशिक्षण शिबिर आयोजित करण्यात आले होते.

या प्रशिक्षणात भारतीय मानक ब्युरोचे वैज्ञानिक टी.अर्जन व आशिष वाकले यांनी उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांना भारतीय मानक ब्युरो संदर्भात प्रशिक्षण दिले. तसेच रायगड जिल्ह्याच्या मुख्यालयाव्यतिरिक्त सर्व शासकीय कार्यालयांना या वेळी ऑनलाईन पध्दतीने सहभागी करुन प्रशिक्षण देण्यात आले.

रायगड जिल्ह्यातील विविध शासकीय कार्यालयांचे प्रमुख या प्रशिक्षण शिबिरात सहभागी झाले होते. या शिबिराच्या यशस्वी आयोजनाकरिता जिल्हा पुरवठा अधिकारी मधुकर बोडके व जिल्हा पुरवठा कार्यालयाच्या इतर अधिकारी व कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# कीर्तनकार पांडुरंग मारणे राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित



**माणगाव : प्रतिनिधी**

तालुक्यातील वावे तर्फे निजामपूर येथील प्रसिद्ध कीर्तनकार पांडुरंग बाबू मारणे यांना कोल्हापूर येथील अविष्कार फाउंडेशन इंडिया या संस्थेतर्फे रविवारी (दि. २०) मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष लक्ष्मीकांत देशमुख यांच्या हस्ते राज्यस्तरीय गुरुमाऊली सेवा पुरस्कार २०२२ देवून सन्मानित करण्यात आले.

फाउंडेशनतर्फे दरवर्षी वेगवेगळ्या क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींचा जिल्हा व राज्य स्तरावर पुरस्कार देऊन गौरव करण्यात येतो. वानवडी पुणे येथील महात्मा ज्योतिराव फुले सांस्कृतिक भवन याठिकाणी झालेल्या या पुरस्कार वितरण सोहळ्याला माजी महापौर प्रशांत जगताप व फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष संजय पवार, कोकण विभागीय अध्यक्ष संदीप नागे, प्रा. किसनराव कुराडे, माजी जिल्हा परिषद सदस्या क्रांतीदेवी कुराडे, उद्योजक गंभीर मुंदीनकेरी, डॉ. प्रकाश चौधरी, शंकर शिंदे, डॉ. संतोष भोसले, सुचेता कलाजे आदी मान्यवर उपस्थित होते.

## माणगाव येथील सायराबानू चौगुले यांच्या काव्य संग्रहास पुरस्कार

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगावच्या प्रसिद्ध कवयित्री सायराबानू वजीर चौगुले यांच्या 'चांदणं शब्दांचं' या काव्यसंग्रहाची मुस्लिम मराठी सांस्कृतिक मंडळाने सन २०१९–२०२१ च्या उत्कृष्ट साहित्य निर्मितीच्या पुरस्कारासाठी निवड केली आहे.

औरंगाबाद येथे रविवारी (दि.२७) होणाऱ्या कार्यक्रमात मान्यवरांच्या उपस्थितीत या पुरस्काराचे वितरण करण्यात येणार आहे.



# राज्यस्तरीय लाठी स्पर्धेत रायगड संघाची सुवर्ण कामगिरी

## ३६ सुवर्ण, १२ रौप्य व १६ कांस्यपदकाची कमाई

**रेवदंडा : प्रतिनिधी**

तिसरी राज्यस्तरीय लाठी अजिंक्यपद क्रीडा स्पर्धा १९ ते २० नोव्हेंबरदरम्यान तुळजापूर येथे झाली. यात रायगडमधून ३६ खेळाडूंनी सहभाग घेत सुवर्ण कामगिरी केली आहे. या खेळाडूंनी ३६ सुवर्णपदक, १२ रौप्यपदक व १६ कांस्यपदकांची कमाई केली. त्याचप्रमाणे स्पर्धेत पदकांच्या यादीमध्ये राज्यात रायगड संघाने द्वितीय क्रमांकाचे चषक पटकावले आणि रायगडकरांचे नाव उंचावले.




मुलांमध्ये शिवम गुंजाळ याने एक सुवर्ण व एक कांस्यपदक, मंथन कदम एक कांस्यपदक, प्रियेश मसाल एक सुवर्ण, एक रौप्य, एक कांस्यपदक, भावार्थ पाटील एक रौप्यपदक, आराध्य शेळके दोन सुवर्णपदक, मिहिर शेळके एक सुवर्णपदक, तेज शेळके एक कांस्यपदक, वेद कदम दोन कांस्यपदक, मल्हार गुंजाळ दोन सुवर्णपदक, वेदास्तु गुरव दोन रौप्यपदक, देवदत्त पडवळ दोन सुवर्ण पदक, अर्णव तिवरेकर एक रौप्यपदक, हार्दिक अकोलकर एक रौप्यपदक, हित म्हात्रे एक सुवर्णपदक, हर्ष पाटील एक रौप्य, एक कांस्यपदक, सुजल झावरे एक सुवर्णपदक, एक कांस्य, रुद्र झावरे एक कांस्य, स्वरुप पाटील एक सुवर्ण, एक कांस्य पदक, दीप झावरे एक कांस्यपदक, श्रवण शेळके एक सुवर्ण, एक कांस्यपदक, मनस्व शेळके एक रौप्यपदक, सिद्धार्थ पाटील दोन सुवर्ण, एक रौप्यपदक, शिव हिलम दोन सुवर्ण, एक रौप्यपदक, रुद्राक्ष खारकर एक सुवर्ण, एक रौप्यपदक, निशांक शेळके दोन सुवर्णपदक पटकावले.

त्याचप्रमाणे मुलींमध्ये ओवी शेळके तीन सुवर्णपदक, आराध्या वर्तक एक सुवर्ण, एक कांस्य, आराध्य पंडीत नखाते एक सुवर्ण, एक कांस्यपदक, स्नेहा प्रचित मसाल दोन सुवर्ण, एक कांस्यपदक, तमन्ना पाटील दोन सुवर्ण, एक कांस्यपदक, सृष्टी म्हामूणकर एक सुवर्ण, एक कांस्यपदक, साना तुळपुळे दोन सुवर्ण, एक रौप्यपदक, स्मृती म्हात्रे एक सुवर्ण, दोन कांस्यपदक, रेवा पाटील एक सुवर्ण, एक कांस्यपदक, लावण्या भगत दोन सुवर्णपदक, नम्रता चव्हाण एक सुवर्ण, एक कांस्यपदक पटकावले.

सर्व खेळाडूंनी एकम लाठी, दुय्यम लाठी, द्वै अनिखा, काटपवित्रा आणि पंचम लाठी या प्रकारात ही सर्व पदके कमावली आहेत. सुवर्णपदक विजेत्या खेळाडूंची निवड राष्ट्रीय स्पर्धेकरीता झाली आहे. या सर्व खेळाडूंना आंतराष्ट्रीय पंच प्रियंका गुजांळ, राष्ट्रीय पंच शुभम महेंद्र नखाते, वेदांत सुर्वे व रुपेश शेळके यांचे प्रशिक्षण लाभले, तसेच लाठी असोशिएशन रायगडचे अध्यक्ष प्रमोद मसाल यांनी सर्व खेळाडूंचे अभिनंदन केले.

# 'सीकेटी'च्या मुलींची कॅरम स्पर्धेत बाजी



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय रायगड अलिबाग अंतर्गत मंगळवारी (दि. २२) झालेल्या पनवेल महानगरपालिका जिल्हास्तरीय शालेय कॅरम स्पर्धेत जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगू काना ठाकूर (सीकेटी) ज्युनिअर कॉलेजच्या विद्यार्थीनींनी यश संपादन केले.

यामध्ये तन्वी रोहिदास चोरघे १२वी प्रथम क्रमांक, अंजली राजेश सिंग ११वी द्वितीय क्रमांक, तन्वी प्रकाश माधवी १२वी तृतीय क्रमांक पटकावला. या सर्व विद्यार्थिनींची मुंबई विभगीय कॅरम स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

त्याबद्दल संस्थेचे सचिव डॉ. एस. टी. गडदे, सहसचिव भाऊसाहेब थोरात, पर्यवेक्षक अजित सोनवणे, प्रशांत मोरे, क्रीडा शिक्षक अरुण पाटील, माधवी कोळी, मनोज पाटील तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी त्यांचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# एस. एस. पाटील शाळेचे क्रीडा क्षेत्रात सुयश



**उरण : बातमीदार, प्रतिनिधी**

एस. एस. पाटील इंटरनॅशनल स्कूल द्रोणागिरी शाळेतील विद्यार्थ्यांनी क्रीडा क्षेत्रात उत्तम कामगिरी केली आहे.

१०वी यूनिफाइड जिल्हास्तरीय चॅम्पियनशीप स्पर्धा सातारा येथे आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेमध्ये एस. एस. पाटील शाळेच्या स्वयम पाटील इ. २री सुवर्णपदक, स्मिथ नारंगीकर इ. २री सुवर्णपदक, दिव्य मुंबईकर इ. २री सुवर्णपदक, आदित्य घोडके इ. ६वी सुवर्णपदक, आरुष पाटील इ. ७वी सुवर्णपदक, रूद्र भोसले इ. ७वी सुवर्णपदक, अक्षरा घोडके इ. ६वी सुवर्णपदक, त्रिशिता भोईर इ. ८वी सुवर्णपदक या सर्व विद्यार्थ्यांनी विक्रमी यश प्राप्त केले आहे. या सर्व सुवर्णपदक विजेत्यांना शाळेच्या मुख्याध्यापिका मृदूला धोडी यांचे मार्गदर्शन व शिक्षक सुरज टकले यांचेकडून प्रशिक्षण मिळाले आहे. सर्व विद्यार्थ्यांवर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

### निमंत्रित संघांची क्रिकेट स्पर्धा

# रायगडच्या मुलींचा रत्नागिरीवर ३३२ धावांनी विजय

**अलिबाग : प्रतिनिधी**



महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनतर्फे आयोजित करण्यात आलेल्या निमंत्रित संघांच्या १५ वर्षांखालील मुलींच्या क्रिकेट स्पर्धेत रायगडाने रत्नागिरीवर ३३२ धवांनी दणदणीत विजय मिळवला.

समृद्धी कांबळे (१६७ धावा), रोशनी पारधी ( ६६ धावा) व तनिशा शर्मा (६२ धावा) यांनी केलेल्या दमदार फलंदाजीमुळे रायगडाने ४०६ धावा केल्या.

रत्नागिरीचा डाव अवघ्या ७२ धवांमध्ये आटोपला. समृद्धी कांबळेने तीन, रोशनी पारधीने दोन बळी घेतले. रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष चंद्रकात मते व रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे सर्व पदाधिकाऱ्यांनी रायगड संघातील खेळाडू संघाच्या व्यवस्थापिक मनीषा अडबल यांचे अभिनंदन केले.

# व्हॉलिबॉल स्पर्धेत रोटरी इंग्लिश मिडियम स्कूल विजयी

**उरण : वार्ताहर**



जिल्हा क्रीडा परिषद अलिबाग आणि पंचायत समिती उरण यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवारी (दि. १९) युईएसच्या भव्य पटांगणात तालुकास्तरीय व्हॉलिबॉल स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत १४ वर्षांखालील व १७ वर्षांखालील मुलांच्या गटात रोटरी इंग्लिश मिडियम स्कूल विजयी ठरले, तर युईएस इंग्लिश मिडियम स्कूल अँण्ड ज्युनिअर कॉलेज उपविजेते ठरले.

युईएस संस्थेचे माजी अध्यक्ष व सदस्य अ‍ॅड. राजेंद्र भानुशाली यांच्या हस्ते स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. त्यांच्यासोबत उरण तालुका समन्वयक मनोहर टेमकर, सिनियर कॉलेजच्या प्रभारी प्राचार्या सोनाली म्हात्रे, स्कूल व ज्यु.कॉलेजच्या प्राचार्या सिमरन दहिया, सिनियर कॉलेजच्या एचओडी, पूर्व-प्राथमिक, प्राथमिक व माध्यमिक विभागातील सुपरवायझर्स, तसेच एक डॉक्टर व एक सहाय्यक, सर्व शाळेतील स्पर्धक आणि त्यांचे क्रीडा प्रशिक्षक उपस्थित होते.

# स्पिरिट शिल्ड क्रिकेट स्पर्धेत उरण स्पोर्ट्स व भेंडखळचा संघ विजयी

**उरण : बातमीदार**

खोपोली येथील हाय डेफिनेशन स्पोर्ट्स मॅनेजमेंट आयोजित स्पिरिट शिल्ड १५ वर्षांखालील लेदर बॉल एकदिवसीय ४५ षटकांच्या क्रिकेट स्पर्धेतील साखळी सामन्यांत उरण क्रिकेट स्पोर्ट्स असोसिएशन व भेंडखळ क्रिकेट अकॅडमी संघांनी विजय मिळवला.





उरण क्रिकेट स्पोर्ट्स असोसिएशनने नवी मुंबई वाशी येथील अविनाश साळवी फाउंडेशन संघाचा २२८ धावांनी पराभव करीत सामना जिंकला. उरण संघाकडून ओम म्हात्रे याने १०७ चेंडूंचा सामना करीत सर्वाधिक १६० धावा ठोकल्या. त्याला सामानावीर म्हणून गौरविण्यात आले, तर शौर्य पाटील याने ६५ धावा केल्या. अविनाश साळवी फौंडेशन संघाकडून अर्णव रामदासी याने ६३ धावांची खेळी केली.

दुसऱ्या एका साखळी सामन्यात भेंडखळ क्रिकेट अकॅडमी संघाने रोहा येथील दिशा क्रिकेट अकॅडमी संघाचा २३५ धावांनी पराभव करीत सामना एकतर्फी जिंकला. भेंडखळ संघाचा गोलंदाज शिवांश तांडेल याने सर्वाधिक पाच गडी बाद केले, तर दक्ष पाटील यान ९९, निर्जर पाटील ८३, साम्य पाटील ७३, जिग्नेश म्हात्रे नाबाद ५४ धावा काढल्या. दिशा क्रिकेट अकॅडमीकडून अमित जोगडे यांनी ८० धावांची झुंज दिली. शिवांश तांडेल याला सामनावीर म्हणून गौरविण्यात आले.

स्पर्धेत एकूण १६ संघांनी सहभाग घेतला असून प्रत्येक संघाला तीन मॅचेस खेण्यास मिळणार आहेत. प्रत्येक ग्रुपमधून दोन टॉप संघ उपांत्य फेरीत दाखल होणार आहेत. ही स्पर्धा एक महिना चालणार असून सर्व सामने ४५ षटकांचे असणार आहेत. त्यामुळे प्रत्येक संघातील १४ खेळाडूंना आपला खेळ दाखवण्याची पुरेपूर संधी मिळणार आहे.

स्पर्धा यशस्वी होण्यासाठी उमाशंकर सरकार, हृषीकेश कर्नुक, निकुंज विठलांनी, रोहित कार्ले परिश्रम घेत आहेत.

# पुणे हाफ मॅरेथॉनसाठी ऑलिम्पियन सुधा सिंग ब्रँड ॲम्बॅसेडर

**पुणे : प्रतिनिधी**

येत्या रविवारी (ता. २७) होणाऱ्या बजाज अलियान्झ पुणे हाफ मॅरेथॉनसाठी भारताची अव्वल धावपटू ऑलिंपियन सुधा सिंग यांची ब्रँड ॲम्बॅसेडर म्हणून निवड करण्यात आली आहे.

सुधा सिंग यांना पद्मश्रीने सन्मानित करण्यात आले आहे. २०१३मध्ये त्यांनी आशियाई स्पर्धेत ३००० मीटर स्टीपलचेस शर्यतीत रौप्यपदक जिंकले होते. २०१०च्या गुंगझाओ आशियाई क्रीडा स्पर्धेत स्टीपलचेसचा प्रथमच समावेश करण्यात आला होता. यात मूळ उत्तर प्रदेशातील रायबरेली येथील असलेली सुधा सिंग यांनी केवळ सुवर्णपदकच जिंकले नाही, तर नव्या राष्ट्रीय विक्रमाची नोंद केली.

# पोलीस कर्मचाऱ्यांचे विविध स्पर्धांमध्ये यश





**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

राज्य राखीव पोलीस बल गट क्र. १ व २ पुणे येथे ७१वी अखिल भारतीय पोलीस रेसलिंग क्लस्टर पुरुष शरीर सौष्ठव अंतिम निवड चाचणी झाली. या स्पर्धेमध्ये रायगड दलातील पोलीस नाईक राजेंद्र चंद्रकांत गाणार यांनी कांस्यपदक पटकाविले.

त्याचप्रमाणे विजयदुर्ग, सिंधुदुर्ग येथे चौथी सी/चॅनेल स्विमिंग स्पर्धा झाली. त्यामध्ये रायगड पोलीस दलातील पोलीस नाईक अमित वासुदेव पाटील यांनी कांस्यपदक मिळविले आहे. रायगड पोलीस दलातर्फे दोन्ही खेळाडूंनी मिळविलेल्या यशाबद्दल त्यांचे अभिनंदन करण्यात आले.



पनवेल : भाजप तालुकाध्यक्ष तथा जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत यांना वाढदिवसानिमित्त न्हावा ग्रामपंचायतीचे सरपंच हरिश्चंद्र म्हात्रे यांनी शुभेच्छा दिल्या.



सौजन्य : अमर म्हात्रे (उपसरपंच, ग्रुप ग्रामपंचायत वहाळ)




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com